❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २७३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com   Epaper - www.sandhyaepaper.com   www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com

# काँग्रेसचा 'फेक नरेटिव्ह' उघडा पडला

## राहुल गांधींना देशात 'अतिडावी' राजवट आणायची, मुख्यमंत्री फडणवीसांचा घणाघाती आरोप

■ नागपूर (दै. संध्या)

निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेमुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'फेक नरेटिव्ह' पूर्णपणे उघडा पडला असल्याचा दावा करत, राहुल गांधी संवैधानिक संस्थांना बदनाम करून देशात अतिडावी राजवट आणण्याचा आणि अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत असल्याचा घणाघाती आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. संविधानाचे पुस्तक हातात घेऊन घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास उडवणे हे राहुल गांधींचे पूर्वनियोजित डिझाइन असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली अराजकतेची भीती आज ते खरी करून दाखवत असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, मला असं वाटतं की काल तीनही निवडणूक आयुक्तांनी जी पत्रकार परिषद घेतली त्यामुळे राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा फेक नरेटिव्ह हा पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. मी पहिल्या दिवशीपासून सांगतो आहे राहुल गांधी यांच डिझाईन वेगळं आहे. संविधानाचं पुस्तक हातामध्ये घेऊन संवैधानिक संस्थांवर रोज आरोप लावायचे, संवैधानिक संस्था प्रश्नांकित करायच्या, त्याच्यावरचा लोकांचा विश्वास उडवायचा अशा पद्धतीची कारवाई आहे. भारतीय संविधान ते जरी दाखवत असले तरी त्यांना या संविधानाने दिलेली लोकशाही काही मान्य नाहीये, या संविधानाने तयार केलेल्या संवैधानिक संस्था मान्य नाहीयेत.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझं तर स्पष्ट मत आहे की राहुल गांधींना हळूहळू सर्व संवैधानिक संस्था बदनाम करून भारतीय संविधानावरच प्रश्नचिन्ह उभं करायचं आहे. कारण आता त्यांचं संपूर्ण मानसिकता ही कम्युनिस्ट, साम्यवादी, अतिडावी झालेली आहे आणि त्यांना या भारतामध्ये अतिडावी राजवट आणायची आहे, असा दावाही फडणवीस यांनी केला आहे.

तसेच भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शेवटच्या भाषणामध्ये, संविधान सभेमध्ये जे बोलून दाखवलं होतं, जी शंका सांगितली होती आणि ज्या प्रकारची एनार्की (अराजकता) तयार केली जाऊ शकते हे सांगितलं होतं, ते राहुल गांधी स्पष्टपणे करताना दिसतायत. त्यामुळे निश्चितपणे ते हळूहळू या संविधानावरनं लोकांचा विश्वास उठला पाहिजे अशा प्रकारचा त्यांचा प्रयत्न दिसतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, खरं तर आपण जर काल बघितलं तर कालच्या प्रेस कॉन्फरन्स मध्ये एका वृत्तपत्राने छापलेली बातमी ही किती कपोलकल्पित आहे हे स्पष्ट झालेलं आहे आणि त्या बातमीवर आधारित जे आंदोलन उभं राहतंय तेही किती तकलादू आहे हे आपल्यासमोर आलेलं आहे.

तीनही आयुक्तांनी सांगितलं SIR सहित सगळ्या प्रक्रिया एक मताने झालेल्या आहेत. या प्रक्रियेमध्ये कुठेही डिफरन्स ऑफ ओपिनियन नाहीये. कॅबिनेट सेक्रेटरीकडे गेलेलं पत्र हे कुठल्याही नीतिगत विषयावरचं पत्र नाही, कुठल्याही धोरणावरचं पत्र नाही, तर एक जी डेपुटेशनवर झालेली अपॉइंटमेंट आहे या अपॉइंटमेंटशी संबंधित पत्र आहे. मात्र जणू काही डिफरन्सेसने पत्र पाठवलेलं आहे असं देखील सांगण्याचा प्रयत्न केलाय, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, सर्वात महत्त्वाचा फॉर्म नंबर सहाच्या संदर्भात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने फॉर्म नंबर सहा हा ज्या फॉरमॅटमध्ये वैध ठरवलेला आहे, त्याच फॉरमॅटमध्ये फॉर्म नंबर सहा असताना त्या संदर्भात संभ्रम निर्माण करणं म्हणजे माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या संदर्भात एक प्रकारे संभ्रम निर्माण करण्याचं काम चाललेलं आहे. आणि म्हणून एकूणच काल या आरोपातला फोलपणा स्पष्ट झालेला आहे.

### संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न

मुळात काँग्रेस आणि राहुल गांधी आपली संविधान विरोधी भूमिका ही या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करतायत. संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतायत आणि जनतेमध्ये विश्वास उरलेला नाही, तो आपल्याला विश्वास मिळवता येत नाही म्हणून सिस्टीमबद्दल अविश्वास निर्माण करायचा अशा प्रकारचा हा प्रयत्न आहे, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

### दुष्काळावर काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, मुळातच आपण काल 265 तालुके हे दुष्काळग्रस्त जाहीर केलेले आहेत आणि या तालुक्यांमधली मदत ही सरसकट जाणार आहे. या संदर्भात ज्या तातडीच्या गोष्टी करायच्या आहेत त्याची काल आपण घोषणा केलेली आहे. 12 उपाययोजना ज्या तातडीच्या आहेत त्याला मान्यता पण दिलेली आहे आणि आपल्याला माहिती आहे की फर्स्ट ट्रिगरवर आता आपण या ठिकाणी हा आदेश काढलेला आहे.

पुढे देवेंद्र फडणवीस म्हणाले, ही स्ट्रॅटजी कुठेही कामी येणार नाही. जनतेला हे समजतं आणि कुठल्याही परिस्थितीत ही जी काही संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याची त्यांची मोहीम आहे, याला योग्य उत्तर मिळेल. भारताचं संविधान, त्या संविधानाने तयार केलेल्या संस्था या अबाधितच राहतील. किती प्रयत्न केला तरी इथे साम्यवादी राजवट आम्ही आणू देणार नाही. निवडणूक आयोग भाजपचं बी टीम असल्याची टीका विरोधकांकडून केली जाते. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, जे जे लोक हारतात त्या त्या लोकांना हारण्याचं खापर निवडणूक आयोगावर फोडायची इच्छा असते. तेलंगणाला जिंकल्यानंतर निवडणूक आयोग चांगलं असतं, पंजाबमध्ये जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, हिमाचलमध्ये जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, कर्नाटकला जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, पण भाजप जिंकल्याबरोबर त्याच निवडणूक आयोगाला कोणते शिंग फुटतात मला माहिती नाही आणि मग ते लगेच खराब होतं.

जनतेमध्ये जाऊन जनतेचे प्रश्न त्या ठिकाणी मांडा, तर जनता तुमच्या पाठीशी येईल, असा सल्ला देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. तसेच आधी ईव्हीएम होतं, आता ईव्हीएमच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाने निकाल दिला. ईव्हीएमच्या संदर्भात इलेक्शन कमिशनने चॅलेंज दिला 15 दिवस ज्याला ईव्हीएम हॅक करता येतंय करून दाखवा, यांच्यापैकी कोणी करू शकलं नाही. त्यामुळे आता ईव्हीएम यांनी सोडलं आणि आता इलेक्शन कमिशनलाच घेऱ्यामध्ये घ्यायचा प्रयत्न हे करतायत जे अतिशय चुकीचं आहे, असे फडणवीस म्हणाले.

# दोन महामंडळ आणि एक विधानपरिषद! फडणवीसांनी मला आश्वासन दिलं : आठवले

■ मुंबई (दै. संध्या)

आम्ही आमच्या ताकदीवर निवडून येत नाही. मात्र, आरपीआय पक्ष जरी महाराष्ट्रात सत्तेत नसला तरी कोणाला निवडून आणायचं आणि कोणाला पाडायचं ही ताकद आणि मते आमच्याकडे आहेत असं वक्तव्य केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. कार्यकर्त्यांची ताकद माझ्या मागे उभी आहे असेही आठवले म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी मला आश्वासन दिलेलं आहे. त्यांच्याकडे आम्ही दोन महामंडळ अध्यक्ष आणि एक विधानपरिषद जागा मागितलेली आहे असेही आठवले म्हणाले.

राजीनामा मागण्याच्या मुद्द्यावरुन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी कॉकरोच जनता पार्टीवर टिका केली आहे. राजीनामा मागण्यासाठी; कॉकरोच जनता पार्टी आहे का? असा सवाल करत त्यांनी आपलं x नाव बदलून राजीनामा जनता पार्टी करावं असा खोचक टोला लगावला. यावेळी आठवलेंनी निवडणूत आयुक्त ज्ञानेश कुमार यांची पाठराखण केली आहे. ज्ञानेश कुमार यांनी कोणाच्याही दबावाखाली येऊन राजीनामा देऊ नये असं देखील आठवले यावेळी म्हणाले.

रायगड मधील एकच श्रीवर्धन तालुक्याचा दुष्काळी तालुका म्हणून समावेश करण्यात आला आहे. यावर बोलताना आठवले म्हणाले की बाकीच्या तालुक्यांचा देखील विचार होणे गरजेचे आहे. राज्यात 70 टक्के दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये राज्यातील 265 तालुक्यांचा समावेश आहे.



रायगड मधील फक्त एकच श्रीवर्धन तालुका दुष्काळी तालुका म्हणून जाहीर करण्यात आले आहे. मात्र भात शेतीचे कोठार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यात अनेक तालुक्यांमध्ये उशिरा आलेला पाऊस, त्यानंतर जास्त पडलेल्या पावसामुळे पुराच्या पाण्यात वाहून गेलेली भात शेती अशा अनेक कारणांमुळे भातशेती अडचणीत आहे. असे असताना अनेक तालुक्यांचा विचार होणे गरजेचे आहे, त्यासाठी मी नक्की विचार आणि प्रयत्न करेन असं वक्तव्य रामदास आठवले यांनी केलं आहे. रामदास आठवले यांच्या केंद्रीय मंत्री पदाला दहा वर्ष पूर्ण होत आहेत त्या निमित्ताने त्यांचा रायगडचा पाली येथे भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते.

# दुष्काळ जाहीर केला, मग प्रत्यक्ष मदत कधी?; आदित्य ठाकरेंचा घणाघात

■ परभणी (दै. संध्या)

मराठवाडा दुष्काळी पाहणी दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी परभणी जिल्ह्यात दाखल झालेल्या आदित्य ठाकरे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. यानंतर परभणीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली.

"दुष्काळ जाहीर केला, शासनाने जीआर काढून १२ उपाययोजनाही जाहीर केल्या, मात्र प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात मदत कधी येणार? वाढत्या शेतकरी आत्महत्या पाहता, जर शेतकऱ्यांची मदत तातडीने पोहोचली नाही, तर राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा (लॉ अँड ऑर्डर) मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो," असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

दुष्काळाची सद्यस्थिती मांडताना आदित्य ठाकरे म्हणाले, "परिस्थिती अतिशय बिकट असून दुष्काळाची तीव्रता वाढत जाणार आहे. कालपासून मी सोलापूरसह अनेक भागांची पाहणी केली आहे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे मदत कधी मिळणार, हे कळणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की सरकारच्या १२ उपाययोजना त्यांच्या उपयोगाच्या नाहीत. मागच्या वर्षीच्या अतिवृष्टीची मदत अद्याप आलेली नाही, कर्जमाफीचे पॅकेज मिळाले नाही आणि आता जाहीर झालेली दुष्काळाची मदत कधी येणार,



याबाबत मुख्यमंत्र्यांनी स्पष्टीकरण द्यावे, कारण आता शेतकऱ्यांचा जीआरवर विश्वास राहिलेला नाही." वाढत्या शेतकरी आत्महत्यांवर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

मदतीसाठी उशीर लागणार असल्याचे सांगणाऱ्या मंत्र्यांना आटोक्यात आणण्याची गरज असल्याचे सांगत आदित्य ठाकरे यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. "राज्यातील ७५ टक्के भागात दुष्काळ जाहीर झालाय. गेल्या दोन-तीन वर्षांत शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. मागच्या वर्षी अतिवृष्टीचे ३२ हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर झाले, तो पैसा गेला कुठे? सॅटेलाईटमधून पाहणी करण्यापेक्षा, प्रत्यक्ष खाली पिके करपली आहेत त्याचे काय?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

सरकारने कर्जवसुलीला स्थगिती दिल्याचे म्हटले असले तरी अनेक गावांत बँकांच्या नोटिसा येत असल्याचे आदित्य ठाकरे यांनी निदर्शनास आणून दिले. "सरकार पूर्णपणे गोंधळलेले आहे. शेतकऱ्यांनी मला बँकांच्या नोटिसा दाखवल्या आहेत, त्या त्वरित थांबल्या पाहिजेत. केवळ परीक्षा शुल्क नको, तर पूर्ण शैक्षणिक वर्षाची फी माफ झाली पाहिजे. जनावरांना चारा नाही आणि पिण्याचे पाणी नाही. जनावरे विक्रीला नेली तर तथाकथित गोरक्षकांकडून त्रास दिला जातो. हा वाद वाढला आणि शेतकरी आक्रमक झाला तर कोण थांबवणार?" असा संताप त्यांनी व्यक्त केला.

केंद्राच्या भूमिकेबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलताना त्यांनी ज्ञानेश कुमार प्रकरणावरूनही टीका केली. "केंद्र सरकार ज्ञानेश कुमार यांना वाचवण्यात व्यस्त आहे. पण माझी केंद्राला आग्रहाची विनंती आहे की, पीएम केअर (PM CARES) फंडातूनही महाराष्ट्राला मदत करण्यात यावी," अशी मोठी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली. तसेच, या भीषण दुष्काळावर चर्चा करण्यासाठी पावसाळी किंवा हिवाळी अधिवेशनाची वाट न पाहता तातडीने विशेष अधिवेशन बोलावण्यात यावे, या पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मागणीचा त्यांनी पुनरुच्चार केला. जे २५ टक्के तालुके दुष्काळाच्या यादीतून वगळण्यात आले आहेत, त्यांच्यासाठीही पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# दुर्गम भागातील आदिवासी व विद्यार्थ्यांसाठी लालपरीची खास धाव

## १०० 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' मिडी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार - मंत्री सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, डोंगरदऱ्यांच्या कुशीत, नागमोडी वाटांवर आणि दुर्गम वाड्या-वस्त्यांमध्ये राहणाऱ्या सर्वसामान्यांच्या जीवनाशी अतूट नाते जोडलेली 'लालपरी' आता आणखी दूरवर पोहोचणार आहे. राज्यातील दुर्गम, डोंगराळ आणि अरुंद रस्त्यांवरील आदिवासी बांधव, ग्रामीण जनता तसेच विद्यार्थ्यांच्या प्रवासाला नवी दिशा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात १०० 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी' मिडी बसेस दाखल होणार आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

'एसटी तेथे एसटी!' हे केवळ घोषवाक्य नसून, महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकापर्यंत सार्वजनिक वाहतुकीची जीवनवाहिनी पोहोचविण्याचा एसटीचा निर्धार आहे. ज्या वाडी-वस्तीतील आदिवासी बांधव आणि विद्यार्थी आजही शिक्षण, रोजगार, आरोग्य व दैनंदिन गरजांसाठी अनेक किलोमीटरची पायपीट करतात, त्यांच्या पावलांना आता लालपरीची साथ मिळणार आहे. दुर्गम भागातील पायवाटेवरून एसटीची वाट निर्माण करणे, हेच या निर्णयामागचे उद्दिष्ट आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, डोंगर-दऱ्या, तीव्र चढ-उतार, अरुंद रस्ते आणि नागमोडी वळणांमुळे अनेक ठिकाणी मोठ्या बसेस पोहोचणे शक्य होत नाही. परिणामी, या भागातील आदिवासी




नागरिक आणि विशेषतः शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज १० ते १५ किलोमीटरपर्यंतची पायपीट करावी लागते. या पायपीटीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या वाटेत अडथळे निर्माण होऊ नयेत आणि दुर्गम भागातील नागरिकांना सुरक्षित, विश्वासार्ह सार्वजनिक वाहतूक उपलब्ध व्हावी, यासाठी २८ आसनी मिडी बसेस दुर्गम मार्गांवर चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मिडी बसेस अशा मार्गांवर धावणार आहेत, जिथे मोठ्या बसेसना पोहोचणे कठीण आहे. त्यामुळे रस्ता कितीही अरुंद असो, चढ कितीही तीव्र असो किंवा वळण कितीही अवघड असो—प्रवाशांच्या सेवेसाठी लालपरीची चाके थांबणार नाहीत, असा निर्धार एसटीने केला आहे.

या मार्गांवरील बससेवा आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणार नसली, तरी नफा-तोट्याच्या गणितापेक्षा आदिवासी बांधव आणि विद्यार्थ्यांची पायपीट थांबविणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी स्पष्ट भूमिका मंत्री सरनाईक यांनी मांडली.

ते म्हणाले, "सार्वजनिक वाहतूक ही केवळ नफा-तोट्याच्या ताळेबंदात मोजण्याची सेवा नाही; ती समाजाशी जोडलेली जबाबदारी आहे. एखाद्या विद्यार्थ्याला शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी दररोजची पायपीट वाचत असेल, एखाद्या आदिवासी कुटुंबाला बाजारपेठ, रुग्णालय किंवा शहराशी जोडणारा प्रवास सहज होत असेल, तर त्या सेवेचे मूल्य केवळ आर्थिक गणिताने ठरविता येणार नाही."

'गाव तिथे एसटी' ही एसटीची वर्षानुवर्षांची ओळख आहे. मात्र, स्वातंत्र्याला ८० वर्षे उलटूनही डोंगर-दऱ्यांच्या कुशीत असलेल्या अनेक आदिवासी पाड्यांपर्यंत एसटीची सेवा अद्याप पोहोचलेली नाही. या पाड्यांना मिडी बसेसच्या माध्यमातून जोडणे म्हणजे केवळ वाहतूक सुविधा देणे नव्हे, तर त्यांना शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि विकासाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे काम आहे," असे प्रतिपादन सरनाईक यांनी केले.

"लालपरीची ही धाव केवळ किलोमीटर मोजणारी धाव नसून, माणसांमधील अंतर कमी करणारी धाव आहे. विद्यार्थ्यांच्या पावलांना शिक्षणाची दिशा देणारी, आदिवासी बांधवांच्या जीवनाला विकासाची जोड देणारी आणि दुर्गम महाराष्ट्राला मुख्य प्रवाहाशी जोडणारी ही सेवा आहे. 'प्रवाशांची सेवा—हीच एसटीची प्राथमिकता' हा मूलमंत्र प्रत्यक्षात आणत, महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकापर्यंत एसटी पोहोचविण्यासाठी आवश्यक ते सर्व निर्णय घेतले जातील," असे मंत्री प्रताप सरनाईक यांनी ठामपणे सांगितले.



# नेपाळमध्ये पुन्हा पूर-भूस्खलन, 6 जणांचा मृत्यू; घरे-पूल वाहून गेले, महामार्ग बंद

■ बुटवल (दै. संध्या)

नेपाळमध्ये सततच्या पावसामुळे पूर आणि भूस्खलनाने परिस्थिती बिकट झाली आहे. आतापर्यंत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. बागलुंग जिल्ह्यात भूस्खलनामुळे एक घर ढिगाऱ्याखाली दबले. या दुर्घटनेत एका महिलेचा आणि तिच्या तीन मुलांचा मृत्यू झाला. पाल्पा जिल्ह्यात २ जणांचा मृत्यू झाला आहे.

दरम्यान, पूर आणि भूस्खलनामुळे अनेक घरे आणि पूल वाहून गेले आहेत. अनेक ठिकाणी महामार्ग बंद झाल्याने वाहतूक विस्कळीत झाली आहे. बुटवलमध्ये पूरग्रस्त भागांतून १,००० हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. यापूर्वी २६ ऑगस्ट रोजी भोटेकोशी नदीला आलेल्या पुरात १,४५३ लोकांचा मृत्यू झाला असून, ५,५०० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत.

धोक्याच्या पातळीपेक्षा 'पाणी' २ मीटर वर

सततच्या पावसामुळे नेपाळमधील अनेक नद्यांची पाणीपातळी झपाट्याने वाढत आहे. देवघाट येथे रविवारी सकाळी ७:४५ वाजता नारायणी नदी ११ मीटर पातळीवरून वाहत होती. ही पातळी धोक्याच्या निशाणापेक्षा २ मीटर जास्त आहे. अधिकाऱ्यांनी नदीची पाणीपातळी आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली होती.

बुटवलमध्ये पुराचा धोका लक्षात घेता सुमारे २०० कुटुंबांना त्यांच्या घरांतून सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले. अनेक भागांत पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. सखल भागात राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### वाल्हे परिसरात गणरायाचे भक्तिमय वातावरणात विसर्जन

**वाल्हे : दैनिक संध्या**

"गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या" असा जयघोष करत वाल्हे (ता. पुरंदर) सह परिसरात लाडक्या श्री गणरायाला भक्तिमय व उत्साही वातावरणात निरोप देण्यात आला. सकाळपासूनच परिसरातील सार्वजनिक मंडळासह घरगुती गणपतीच्या आरतीसाठी गणेश भक्तांची लगबग सुरू होती. त्यानंतर मुहूर्तानुसार वाल्हेसह दौंडज कामठवाडी सुकलवाडी वागदरवाडी आडाचीवाडी पिंगोरी आदी भागात गणेशमूर्तींच्या विसर्जनास सुरवात करण्यात आली. या दरम्यान बहुतांश गणेश मंडळांनी डिजे संस्कृतीला फाटा देऊन गणरायाचे भक्तिमय वातावरणात विसर्जन केले.यावेळी लाडक्या बाप्पाला निरोप देताना गणेश भक्तांचे डोळे पाणावले असले, तरी पुढील वर्षाच्या आगमनाची उत्सुकता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. अशातच विसर्जन सोहळा शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पडावा यासाठी जेजुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक केशव जगताप तसेच हवालदार भाऊसाहेब भोंगळे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### फोनपेकडून ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांसाठी विस्तार योजनेची घोषणा

**पुणे : दैनिक संध्या**

फोनपेने आज आपल्या व्यापारी नेटवर्कच्या विस्ताराला गती देण्याची आणि देशातील लहान शहरे व ग्रामीण भागामध्ये डिजिटल पेमेंटची पायाभूत सुविधा अधिकाधिक उपलब्ध करण्याची योजना जाहीर केली. या विस्ताराचा भाग म्हणून फोनपे पुढील एका वर्षात पे रोल वरील २०,००० हून अधिक प्रत्यक्ष विक्री कर्मचाऱ्यांची भरती करण्याची योजना आखत आहे. कंपनी पुढील १२ महिन्यांत ५० लाखांपेक्षा जास्त पेमेंट डिवाईसेस तैनात करणार आहे, ज्यामध्ये स्मार्ट स्पीकर्स आणि पीओएस डिवाईसेसचा समावेश असेल. या डिवाईसेसपैकी जवळपास ५० टक्के डिवाईसेस भारतातील ग्रामीण भागामध्ये लावली जातील, ज्यामुळे टियर ६ शहरे आणि ग्रामीण भागात डिजिटल पेमेंट स्वीकारण्यास अधिक प्रोत्साहन मिळेल. नुकतेच जाहीर करण्यात आलेल्या एमडीआर आराखड्यामुळे कंपनीला दीर्घकालीन विचार करून व्यापारी विस्तारात गुंतवणूक करणे शक्य होत आहे. जमा झालेल्या एमडीआर रकमेपैकी ५ टक्के रकमेचा स्वतंत्र निधी लहान व्यापाऱ्यांच्या विस्तारासाठी वापरण्यासारख्या उपक्रमांमुळे या गुंतवणुकीला आणखी चालना मिळत आहे, विशेषतः टियर ६ शहरे आणि खेड्यांसह अतिदुर्गम ग्रामीण भागात याचा फायदा होत आहे. गेल्या वर्षी लागू करण्यात आलेल्या नवीन कामगार संहितांसह सुलभ नियमांमुळे कंपनीला अधिक वेगाने भरती करणे शक्य झाले आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांना कंपनीत सामावून घेण्यास मदत होत आहे. भारताने जगातील सर्वात मोठी डिजिटल पेमेंट परिसंस्था निर्माण केली आहे. या प्रवासाच्या पुढील टप्प्यासाठी व्यापाऱ्यांच्या पेमेंट स्वीकारण्याच्या पायाभूत सुविधांमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक आवश्यक ठरणार आहे, ज्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यातील लहान व्यवसायांना डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी होता येईल. फोनपेचा हा नियोजित विस्तार नेमकी हीच संधी साधण्याच्या उद्देशाने करण्यात येत आहे. पे रोल वरील प्रत्यक्ष विक्री कर्मचाऱ्यांच्यासह फोनपेला लहान शहरे व ग्रामीण भागामधील व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचता येईल, त्यांना डिजिटल पेमेंट व्यवस्थेत सामील करून घेता येईल, तसेच केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यास, पेमेंट डिवाईसेस बसवण्यास आणि व्यापाऱ्यांना सातत्यपूर्ण सहकार्य पुरवण्यास मदत होईल. हा विस्तार लाखो लहान व्यापाऱ्यांना औपचारिक आर्थिक परिसंस्थेमध्ये सामील होण्यास मदत करेल. डिजिटल स्वरूपात सक्रिय आणि केवायसी पूर्ण झालेले व्यापारी नेटवर्क व्यवसाय व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता निर्माण करू शकते. यामुळे पात्र व्यापाऱ्यांना कर्ज देणाऱ्या संस्थांकडून मिळणाऱ्या कर्जासह अनेक प्रकारच्या औपचारिक आर्थिक सेवांचा लाभ घेणे शक्य होईल.

### आळंदीत गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात

**आळंदी देवाची: दैनिक संध्या**



गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्त आळंदी शहरात गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. विविध गणेश मंडळांनी आकर्षक सजावट, ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्ये तसेच धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करून मिरवणुकीत रंगत आणली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने शहर दुमदुमून गेले. मिरवणुकीत जय गणेश ग्रुप व प्रतिष्ठान, शिवतेज मित्र मंडळ आणि धर्मराज मित्र मंडळाने सादर केलेले विशेष देखावे नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. शिवतेज मित्र मंडळाच्या वतीने श्री विठ्ठल बिरदेव यात्रा, पट्टणकोडोली येथील पारंपरिक हेडाम नृत्याचे सादरीकरण करण्यात आले. हेडाम नृत्यावेळी भंडाऱ्याची उधळण करण्यात आल्याने मिरवणुकीतील उत्साह अधिकच वाढला. जय गणेश ग्रुपच्या वतीने 'काशीची मणिकर्णिका... अंत नाही, अनंताची सुरुवात' हा पौराणिक व सामाजिक आशय असलेला देखावा सादर करण्यात आला. या देखाव्यातून धार्मिक परंपरेसोबत सामाजिक संदेश देण्यात आला. आळंदीत प्रथमच 'कांतारा' चित्रपटाच्या संकल्पनेवर आधारित भव्य देखावा धर्मराज गणपती मंडळाच्या वतीने सादर करण्यात आला. तसेच जय गणेश प्रतिष्ठानच्या वतीने 'खंडोबा-बानू'चा जीवंत देखावा सादर करण्यात आला. हे देखावे पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मिरवणुकीदरम्यान आळंदी नगरपरिषद चौकात आळंदी नगरपरिषद, ग्रामस्थ, श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, चरित्र समिती आणि पत्रकार संघाच्या वतीने सहभागी गणेश मंडळे तसेच यात्रा पथकाचे स्वागत करण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत व सुरळीत पार पडावी.



# बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होईल

## अनिल कांबळे : अंगणवाडी क्रमांक ५ जाधववाडी येथे वेलकम मेळाव्याचे आयोजन

■ पुरंदर (दै. संध्या)

शासनाच्या नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळाव्यांमुळे बालकांचा शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होईल असे प्रतिपादन पुरंदर तालुका एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी अनिल कांबळे यांनी केले.

जाधववाडी (ता. पुरंदर) येथील दिवे ग्रामपंचायत अंतर्गत जाधववाडी क्रमांक ५ ही डेमो अंगणवाडी म्हणून निवडली आहे येथे नवचेतना व आधारशिला कार्यक्रमांतर्गत वेलकम मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटन प्रसंगी सर्व अंगणवाडी सेविका, बालकांच्या मातांना मार्गदर्शन करताना श्री. कांबळे बोलत होते.

१ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर हा कालावधी पोषण माह म्हणून साजरा करण्यात येत असल्याने "बीट स्तरीय" पोषण माहचा कार्यक्रम सुद्धा जाधववाडी अंगणवाडीत घेण्यात आला. सदर कार्यक्रमात विविध पाककृतीचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. अंगणवाडी सेविकांनी वेलकम मेळाव्यामध्ये बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासासाठी विविध स्टॉल लावून त्याच्या माध्यमातून पालकांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून माहिती दिली.

बालकांच्या जन्मपूर्व ते ३ वर्ष, तसेच ३ वर्ष ते ६ वर्षाच्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच माता पालक, ग्रामस्थ व समुदाय, अंगणवाडी व प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त समन्वयाने नवचेतना आणि आधारशीला उपक्रम राबवण्यात आला. यावेळी पुरंदर प्रकल्पाचे विस्तार अधिकारी बाळकृष्ण काकडे, पर्यवेक्षिका पुष्पल माळी, मुख्याध्यापक सुनील लोणकर, सहशिक्षिका सुरेखा लोणकर, सामाजिक कार्यकर्ते निखिल आढाळगे, भिवडी बीटच्या सर्व अंगणवाडी सेविका, अंगणवाडीतील बालकांच्या माता उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे नियोजन अंगणवाडी सेविका अश्विनी गायकवाड व मदतनीस अक्षदा आढळगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षिका श्रीम.पुष्पल माळी यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी गायकवाड यांनी केले. आभार सुनील लोणकर यांनी मानले.

## कबड्डी स्पर्धेचे काळदरी विद्यालयात यशस्वी आयोजन



■ जेजुरी(दै. संध्या)

कबड्डी-कबड्डी'चा दमदार आवाज तसेच चढाई- प्रतिचढाईने रंगत वाढली आणि प्रत्येक गुणासाठी खेळाडूंनी जिवाचे रान केले. आक्रमक चढाया, भक्कम पकडी आणि क्षणाक्षणाला बदलणाऱ्या डावपेचांमुळे कबड्डीच्या सामन्यात चांगलाच थरार निर्माण झाला... निमित्त होते, ते तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे...! यातून मुलांच्या तीन व मुलींच्या तीन संघांची जिल्हास्तरावर निवड झाली आहे. जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे झालेल्या या शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयात पार पडल्या.

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महासंघाचे सचिव नंदकुमार सागर, ऑलिंपिक असोसिएशनचे सहसचिव निलेश जगताप, सेवानिवृत्त सहायक पोलिस आयुक्त मुरलीधर कारकर व श्री केदारेश्वर संकुलाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडे यांच्या शुभहस्ते तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन झाले . प्रा संतोष नवले, प्रल्हाद कारकर, सुनील घोडके, संजय भिंताडे, शिवाजी गोडसे, बाळासाहेब झेंडे, किशोर दरेकर, प्रविण तांदळे यांच्या नियोजनानुसार स्पर्धा पार पडल्या.

याप्रसंगी कुंडलिक मेमाणे, प्रकाशदादा पवार, विलासकाका जगताप,शहाजी सस्ते, हनुमंत पवार,राजेंद्र कोलट, प्रकाश कारकर, बाबसो कोंडके, बाळासो कारकर, विठ्ठल सणस, संभाजी घोडके, सागर भगत, दादा भगत, माणिक पढेर, शिवाजी कोलट तसेच अनेक माजी विद्यार्थी यांचेसह प्रत्येक संघासोबत मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये १४-१७-१९ वर्षे वयोगटातील मुले व मुली यांचे बुधवार व गुरुवार या दोन दिवसांसाठी आयोजन करण्यात आले आहे.

## ३८ वा पुणे फेस्टिवलमध्ये 'आविष्कार भारती'ने केले मंत्रमुग्ध




■ पुणे (दै. संध्या)

भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सच्या माजी विद्यार्थी आणि सध्याच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्यरचनांची सायंकाळ 'आविष्कार भारती' हा कार्यक्रम ३८ व्या पुणे फेस्टिवल अंतर्गत सादर करण्यात आला. या कार्यक्रमाने मंत्रमुग्ध केले.

या सायंकाळची सुरुवात पुण्याच्या ज्ञान आणि संस्कृतीचा गौरव करणाऱ्या 'शिक्षा और संस्कृति की धरोहर - पुणे' या विशेष सादरीकरणाने झाली. या नृत्यरचनेने विभागीय युवा महोत्सवात प्रथम पारितोषिक पटकावले होते.

या सायंकाळी कथक, भरतनाट्यम, सत्रिय आणि मोहिनीअट्टम या नृत्यप्रकारांचे उत्कृष्ट सादरीकरण झाले. यामध्ये सायली काणे यांची दशमहाविद्या, श्रुती कुलकर्णी यांची सोल इन एक्झाइल, सिद्धी अभय यांची शिखंडी, जयश्री आणि मधुरा इनामदार यांची तृष्णा आणि आदी स्कूल ऑफ डान्सची आंध मुनि यांसारख्या विषयप्रधान नृत्यरचनांचा समावेश होता. या सर्व संकल्पना अतिशय प्रभावी होत्या आणि प्रत्येक रसिकांच्या मनाला भिडल्या.

पूर्वा शहा यांची होरी, तसेच भारती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कथक तराणा आणि कालिंगा नर्तन तिल्लाना_ यांसारख्या पारंपारिक रचनांनी कार्यक्रमात शास्त्रीय सौंदर्याची भर घातली आणि प्रेक्षकांवर अविस्मरणीय छाप पाडली.

संपूर्ण नृत्य-संध्येचे समन्वयन नृत्य विभाग प्रमुख डॉ. देविका बोरठाकुर आणि स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्ट्सचे संचालक प्रा. शारंगधर साठे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या प्रसंगी पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, प्रा. शारंगधर साठे, देविका बोरठाकुर आणि श्रीमती मनीषा अभय, श्रीमती अरुंधती पटवर्धन, श्रीमती लीना केतकर, श्रीमती आभा औटी आणि श्रीमती स्वरदा कुलकर्णी यांसारख्या नामवंत नृत्यांगना आणि गुरू उपस्थित होते.

## सासवडच्या गुरुकुल विद्यालयात अत्याधुनिक प्रयोगशाळांचे उद्घाटन

■ सासवड (दै. संध्या)



येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या गुरुकुल प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक विकासाला चालना देण्यासाठी अत्याधुनिक स्टीम आणि संगणक प्रयोगशाळेचा शुभारंभ करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षा आणि सासवड नगरीच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते फीत कापून या प्रयोगशाळांचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळावे या उद्देशाने ही प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. फायझर, युनायटेड वे मुंबई आणि एक्सपेरिफन या कंपन्यांनी त्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून सुमारे दहा लाख रुपयांची मदत या उपक्रमासाठी दिली आहे. या निधीतून ही अत्याधुनिक प्रयोगशाळा साकारण्यात आली आहे.

या प्रयोगशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कला आणि गणित या विषयांचे सखोल ज्ञान प्रत्यक्ष प्रयोग आणि विविध प्रकल्पांच्या माध्यमातून घेता येणार आहे. त्याचबरोबर नव्याने उभारण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळेमुळे विद्यार्थी संगणक साक्षर होऊन डिजिटल युगाशी जोडले जाणार आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा एक मोठा शैक्षणिक टप्पा मानला जात आहे.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना एक हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त शरदचंद्र आबा जगताप, फायझर कंपनीचे वरिष्ठ संचालक सचिन वाकणकर, युनायटेड वे मुंबईच्या सारा खोकावाला, स्वर्गीय एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सचिव हेमंत ताकवले, डॉक्टर सुमित काकडे, मनोजकुमार वाकचौरे, परेश पाटील, शुभम दारिया, सूर्या बोधला, स्वाती दुर्गाशरण आणि एक्सपेरिफनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापक विजयकुमार हाके यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. या प्रयोगशाळेमागील संकल्पना आणि भविष्यातील वाटचाल याबद्दल त्यांनी माहिती दिली. श्रीमती विद्या कारंडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर उमेश भोई यांनी आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संजीव सोशल फाउंडेशनतर्फे ९ ठिकाणी फिरते विसर्जन हौद

**पुणे : दैनिक संध्या**

संजीव सोशल फाउंडेशनच्या वतीने पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला प्रोत्साहन देण्यासाठी मांजरी व शेवाळेवाडी परिसरात कृत्रिम विसर्जन हौद आणि फिरते गणेशमूर्ती संकलन केंद्र उभारण्यात आले. या उपक्रमातून ३५० हून अधिक गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी ९ ठिकाणी फिरत्या विसर्जन हौदांची व्यवस्था करण्यात आली होती. फाउंडेशनच्या संस्थापिका छाया संजीव गदादे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी धाराशिव जिल्हा परिषद सदस्य अमर मोरे, तुषार जाधव, बाप्पूसाहेब मेमाणे, काका कामठे, संजय जोशी, संतोष खलाडकर, गिरीश कुंजीर, अतुल भगवत यांच्यासह नागरिक व फाउंडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते. विसर्जन हौदांजवळ गणेशमूर्ती विसर्जनापूर्वी आरती करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांना शाल आणि भगवद्गीतेचे पुस्तक यावेळी देण्यात आले. फाउंडेशनचे सचिव सूरज साळुंके म्हणाले, नदी, कालवा आणि इतर नैसर्गिक जलस्रोतांऐवजी नागरिकांनी कृत्रिम विसर्जन हौदांचा वापर केला. त्यातून ३५० हून अधिक गणेशमूर्तींचे संकलन झाले. उपक्रमाच्या सांगतेप्रसंगी मांजरी ग्रीनवुड्स सोसायटीच्या गणेश मंडळाने फिरत्या विसर्जन हौदात गणेशमूर्तींचे विसर्जन केले.

### मुंबई ते मेलबर्न... माधुरी दीक्षित यांच्या 'कोण होणार करोडपती'ची उत्सुकता जगभरात!

**पुणे : दैनिक संध्या**



माधुरी दीक्षित 'कोण होणार करोडपती'च्या सूत्रसंचालकाच्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे आणि तिच्या या नव्या प्रवासाची उत्सुकता आता महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचली आहे. जगभरातील चाहत्यांकडून सोनी मराठीला प्रेम आणि उत्साहाने भरलेल्या प्रतिक्रिया मिळत असून, माधुरीला एका नव्या भूमिकेत पाहण्यासाठी प्रेक्षक आतुर झाले आहेत. सोनी मराठीच्या नव्या प्रोमोमधून हा जागतिक उत्साह पाहायला मिळतो. सिंगापूर, दुबई आणि मेलबर्न, ऑस्ट्रेलिया येथील चाहत्यांच्या खास प्रतिक्रिया या प्रोमोमध्ये पाहायला मिळतात. माधुरीने गेली अनेक दशकं प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे आणि तिच्याशी जोडलेली हीच आपुलकी आजही जगभरातील चाहत्यांमध्ये कायम असल्याचं या प्रतिक्रियांमधून दिसून येतं. मुंबईपासून मेलबर्नपर्यंत, दुबईपासून सिंगापूरपर्यंत माधुरीची लोकप्रियता देशाच्या सीमा ओलांडून पोहोचली आहे. अनेक पिढ्यांनी माधुरीला पाहत तिच्या अभिनयाचा आनंद घेतला आहे आणि आता 'कोण होणार करोडपती'च्या माध्यमातून तिचा हा नवा प्रवास पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत. आता या प्रेमाला मिळणार आहे 'कोण होणार करोडपती'च्या खेळाची रोमांचक जोड. माधुरीची सहजता, आपुलकी आणि तिची खास शैली यामुळे 'कोण होणार करोडपती'चा हा नवा अध्याय आणखी खास होणार आहे. ज्ञान, स्वप्नं, भावनांचा प्रवास आणि खेळाचा थरार यांचा अनोखा संगम या पर्वातून प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. 'कोण होणार करोडपती' १२ ऑक्टोबर २०२६ पासून, सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता, फक्त सोनी मराठीवर!

### प्रा. डॉ. कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार

**पुणे : दैनिक संध्या**

एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून रविवारी (दि. २७ सप्टेंबर) आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषद ही संस्था गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदाच्या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रा. डॉ. मंगेश कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्यासह परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना 'मराठवाडा मित्र' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम रविवारी सकाळी ११ ते दुपारी १.३० या वेळेत ठाणे येथील गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे होणार आहे. या कार्यक्रमाला स्थानिक खासदार नरेश म्हस्के आणि आमदार संजय केळकर यांचीही उपस्थिती लाभणार आहे.



# जय गणेशच्या नामघोषात 'दगडूशेठ' बाप्पांची वैभवशाली सांगता मिरवणूक

**■ पुणे (दै. संध्या)**

श्रीमंत दगडूशेठ गणपती की जय... मोरया, मोरया... जय गणेश... गणपती बाप्पा मोरया... च्या जयघोषात आणि हजारो भक्तांच्या उपस्थितीत 'दगडूशेठ' गणपती बाप्पांची श्री वक्रतुंड रथातून वैभवशाली सांगता मिरवणूक पार पडली. अनंत चतुर्दशी ला रात्री ८ वाजून २५ मिनिटांनी पांचाळेश्वर घाटावरील हौदात मूर्तीचे विसर्जन करून बाप्पाला निरोप देण्यात आला.

सलग चौथ्या वर्षी दुपारी ४ वाजता बेलबाग चौकातून विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. त्यावेळी लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी गणेशभक्तांनी अलोट गर्दी केली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने उत्सवाच्या १३४ व्या वर्षानिमित्त आयोजित गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक अनंत चतुर्दशीला थाटात निघाली. तर, सायंकाळी ७.३० वाजता टिळक चौकात मुख्य विसर्जन रथाचे आगमन होताच हा क्षण डोळ्यात साठविण्यासाठी गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे आणि पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी रथाचे सारथ्य देखील यावेळी केले.

श्री वक्रतुंड रथाची मांडणी यंदाची प्रतिकृती असलेल्या वृंदावनमधील प्रेम मंदिराच्या विषयाप्रमाणे करण्यात आली होती. मंदिर वास्तुकलेने प्रेरित असा हा रथ तयार करण्यात आला. रथाची संकल्पना भारतीय मंदिर वास्तु कलेवर आधारित असून त्यात पारंपरिक शिल्पकला आणि आधुनिक फॅब्रिकेशनचा सुंदर संगम भाविकांना पाहायला मिळाला. मिरवणुकीत 'जय गणेश अमली पदार्थ मुक्त भारत अभियान' जनजागृती करणारा 'मानवसेवा रथ' अग्रभागी होता.

त्यामध्ये विनायक आणि रोहन देवळणकर यांचा चौघडा व प्रमोद गायकवाड यांचे सनई वादन झाले. तसेच स्वरूपवर्धिनीचे पथक, प्रभात बँड, दरबार बँड आणि केरळचे चेंदा मेलम पथक असा लवाजमा होता. तसेच पुरुष भाविकांसह महिला गणेशभक्त देखील मोठया संख्येने सहभागी झाले.

#### मिरवणुकीचे लाईव्ह प्रक्षेपण

दगडूशेठ हलवाई गणपतीची गणेशोत्सवाची सांगता मिरवणूक जगभरातील गणेशभक्तांना अनुभवता यावी, यासाठी ट्रस्टतर्फे यावर्षी विसर्जन मिरवणुकीचे लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले होते. ट्रस्टच्या युट्युब पेजसह सर्व सोशल माध्यमांवर ही मिरवणूक घरबसल्या पाहण्याचा आनंद जगभरातील लाखो गणेशभक्तांनी घेतला.



# कोणार्क सूर्य मंदिर रथातून निघाली मंडई गणपतीची विसर्जन मिरवणूक

## अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाचे १३३ वे वर्ष

**■ पुणे(दै. संध्या)**

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात आणि ढोल-ताशांच्या निनादात अखिल मंडई मंडळाच्या गणपतीची विसर्जन मिरवणूक निघाली. यंदा कोणार्क सूर्य मंदिर रथातून मंडई गणपतीची मिरवणूक काढण्यात आली. सुमारे ३२ फूट उंचीचा भव्य रथ आणि त्यावरील आकर्षक विद्युत रोषणाईने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. २६ सप्टेंबर रोजी सकाळी ४.३० सुमारास पांचाळेश्वर घाट येथे श्रींचे विसर्जन झाले.

अखिल मंडई मंडळाच्या गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. विसर्जन मिरवणुकीसाठी कोणार्क सूर्य मंदिराच्या वास्तुशैलीवर आधारित रथ साकारण्यात आला होता. आकर्षक विद्युत रोषणाई आणि भव्य रचनेमुळे मिरवणुकीदरम्यान रथ पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली.

बेलबाग चौकात ९.५५ मिनिटांनी पहिला सनई चौघडे रथ दाखल झाला. त्यानंतर १०.३६ मिनिटांनी मुख्य रथाचे बेलबाग चौकात आगमन झाले, त्यानंतर टिळक चौकात ४ वाजता मंडई गणपतीचे आगमन झाले आणि ४.३० च्या सुमारास पांचाळेश्वर घाट येथे श्रींचे विसर्जन झाले.

मिरवणुकीच्या अग्रभागी जयंत नगरकर बंधू यांचे सनई-चौघडा वादन, त्यामागे न्यू गंधर्व बँड, शिवगर्जना वाद्य पथक सहभागी झाले होते. पारंपरिक वाद्यांच्या निनादात आणि गणेशभक्तांच्या जयघोषात मिरवणूक मार्गस्थ झाली.

# डिजिटल फसवणुकीच्या घटनांमध्ये तीव्र वाढ

**■ पुणे (दै. संध्या)**

भारताची डिजिटल इकॉनॉमी वेगाने विस्तारत आहे; मात्र त्यासोबतच सायबर फसवणुकीचे प्रमाण आणि त्यातील क्लिष्टताही वाढत आहे. पूर्वी प्रामुख्याने स्पॅम कॉल्स आणि फिशिंग मेसेजेसपुरती मर्यादित असलेली समस्या आता फसवणुकीच्या अधिक व्यापक इकोसिस्टममध्ये विकसित झाली आहे. यामध्ये इम्पर्सोनेशन स्कॅम्स, बनावट बँकिंग रिक्वेस्ट्स, मालिशस लिंक्स, इन्व्हेस्टमेंट फ्रॉड आणि ओटीपीशी संबंधित आर्थिक फसवणुकींचा समावेश आहे.

सरकार आणि इंडस्ट्रीच्या डेटावरून ही समस्या आता मोठ्या प्रमाणावर पसरलेली असून अधिक संघटित स्वरूप धारण करत असल्याचे दिसून येते. इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटर (आय४सी)च्या माहितीनुसार, गेल्या सहा वर्षांत भारतीयांनी सायबर फसवणुकीमुळे ₹५२,९७६ कोटींहून अधिक रक्कम गमावली आहे. एनसीआरबीच्या डेटामधूनही सायबर क्राइमच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते, तर देशभरातील एकूण गुन्ह्यांचे प्रमाण घटले आहे. बँकिंग, पेमेंट्स, हेल्थकेअर, कॉमर्स आणि सरकारी सेवांसह डिजिटल सर्व्हिसेस दैनंदिन जीवनात अधिक खोलवर रुजत असताना, डिजिटल सेफ्टीमध्ये टेलिकॉम नेटवर्क्सची भूमिकाही अधिक महत्त्वाची ठरण्याची अपेक्षा आहे. यूजर्सना आता नेटवर्ककडून केवळ कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देण्याचीच नव्हे, तर डिजिटल कम्युनिकेशनशी संबंधित रिस्क्स ओळखून त्या कमी करण्याचीही अपेक्षा आहे.

दोन वर्षांपूर्वी एअरटेलने हा बदल ओळखून कस्टमर प्रोटेक्शनच्या दिशेने फर्स्ट-मूव्हर ॲप्रोच स्वीकारला. २०२४ मध्ये एअरटेलने भारतातील टेलिकॉम प्रोव्हायडरकडून उपलब्ध करून देण्यात आलेले पहिले नेटवर्क-बेस्ड, एआय-आधारित स्पॅम डिटेक्शन सोल्युशन लाँच केले. या सोल्युशनमध्ये नेटवर्क इंटेलिजन्स आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा एकत्रित वापर करून कस्टमर्सना स्पॅम कॉल्स आणि एसएमएसपासून संरक्षण देण्यात आले. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत एअरटेलने नेटवर्क-लेव्हल फ्रॉड प्रिव्हेन्शनच्या व्यापक प्रयत्नांचा भाग म्हणून आपल्या एआय-आधारित सेफ नेटवर्क इनिशिएटिव्हचा विस्तार केला आहे. कस्टमर्सना अतिरिक्त ॲप्स इन्स्टॉल करण्याची किंवा थ्रेट्स मॅन्युअली रिपोर्ट करण्याची गरज भासू नये आणि बॅकग्राउंडमध्ये काम करणारी सिक्युरिटी सिस्टिम्स तयार करणे हा यामागील उद्देश आहे. एअरटेलचे सेफ नेटवर्क आता नेटवर्क-आधारित डिजिटल सेफ्टी टूल्सच्या व्यापक सुइटमध्ये विकसित झाले आहे. त्यातील प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत: ओटीपीशी संबंधित फ्रॉड प्रोटेक्शन: संशयास्पद इंटरॅक्शन्सदरम्यान यूजर्सना ओटीपी किंवा इतर संवेदनशील क्रेडेन्शियल्स शेअर करण्यास प्रवृत्त केले जात असल्याचे ओळखण्यासाठी आणि अशा परिस्थितीत हस्तक्षेप करण्यासाठी एअरटेलने एआय-आधारित प्रोटेक्शन सादर केले आहे.

# पाळीव प्राणी पाळणाऱ्यांना दैनंदिन देखभालीसाठी हवा आहे जास्त फायदा , सोयीस्कर सेवा आणि अनुभवी तज्ज्ञांची मदत

**■ पुणे(दै. संध्या)**

पुणे : पाळीव प्राण्यांचे संगोपन अधिक गुंतागुंतीचे होत असल्याने, दैनंदिन देखभालीच्या गरजांसाठी त्यांचे पालक अधिकाधिक सोयी आणि योग्य मूल्याच्या शोधात आहेत. झिगली पेट केअरसाठी युनोमरने केलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की, तत्काळ सोय, दैनंदिन बचत आणि विश्वसनीय सल्ला हे असे घटक आहेत जे पाळीव प्राण्यांच्या पालकांना सर्वसमावेशक पेट-केअर सेवांचा शोध घेण्यासाठी प्रोत्साहित करू शकतात. या संशोधनात पुण्यासह १७ ठिकाणांमधील पाळीव प्राण्यांच्या पालकांचा समावेश होता.

या अभ्यासात असेही आढळून आले की, पाळीव प्राण्यांच्या देखभालीसाठी आवश्यक घटक एकत्र आणणे ही फार उत्साहाची गोष्ट आहे, आणि सर्वेक्षण केलेल्या दहापैकी जवळपास नऊ पाळीव प्राण्यांच्या पालकांनी सर्वसमावेशक पेट-केअरमध्ये मध्यम स्वारस्य दाखवले आहे. ही निरीक्षणे लक्षात घेत, झिगली पेट केअरने पुण्यात आपले वार्षिक आरोग्य पॅकेजेस सादर केले आहेत, ज्यात आवश्यक पशुवैद्यकीय, सक्रिय आरोग्यसेवा आणि ग्रूमिंग सेवांचा एकाच वार्षिक योजनेत समावेश केला आहे. पिल्लू, प्रौढ आणि ज्येष्ठ अशा तीन जीवन टप्प्यांवर ही पॅकेजेस आधारित आहेत – आणि केव्हाही उपलब्ध होत असलेला पशुवैद्यकीय सल्ला हे या योजनेचे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे.



पपी केअर (Puppy Care) या पॅकेजची किंमत ₹19,679 असली तरी यातून मिळणारे फायदे हे 26,895 रुपयांएवढे असतील. यात लसीकरण, जंतनाशक उपचार (deworming), प्राथमिक रक्त तपासणी, आहार व पोषणविषयक सल्ला, ग्रूमिंग आणि पशुवैद्यांचा केव्हाही उपलब्ध होणारा सल्ला या सुविधांचा समावेश आहे. ₹43,387 किमतीचे फायदे मिळणाऱ्या आणि ₹23,232 किंमत असलेल्या अडल्ट केअर (Adult Care) पॅकेजमध्ये वार्षिक लसीकरण व जंतनाशक उपचार, रक्त व लघवीची तपासणी, छातीचा X-ray, दातांची तपासणी, ग्रूमिंग, पाच रात्रींसाठी बोर्डिंग/आयपीडी (IPD) सुविधा आणि पशुवैद्यांचा अमर्यादित सल्ला यांचा समावेश आहे. तसेच, ₹54,083 किमतीचे फायदे मिळणाऱ्या आणि ₹34,764 किंमत असलेल्या सीनियर केअर पॅकेजमध्ये वर्षातून दोनदा रक्त आणि लघवीची तपासणी, ईसीजी (ECG) व रक्तदाब तपासणी, सांधे तसेच हाडांची तपासणी, सात रात्रींसाठी बोर्डिंग/आयपीडी (IPD) सुविधा, घरून नमुना संकलन (home sample collection) आणि पशुवैद्यांचा अमर्यादित सल्ला या सुविधांचा समावेश आहे. या उपक्रमावर भाष्य करताना, झिगली पेट केअरचे सीईओ, श्री. सौरभ जैन म्हणाले, "आमच्या संशोधनातून असे दिसून आले आहे की, पाळीव प्राण्यांचे पालक काळजीबाबत अधिकाधिक जागरूक होत असले तरी, वर्षभर लसीकरण, आरोग्य तपासणी, जंतनाशक आणि इतर नियमित गरजांचे व्यवस्थापन करणे कधीकधी आव्हानात्मक ठरू शकते. आमच्या वार्षिक आरोग्य पॅकेजेसद्वारे, आम्ही हे महत्त्वाचे पैलू एकाच योजनेअंतर्गत एकत्र आणून हा प्रवास अधिक सोपा करू इच्छितो, तसेच पाळीव प्राण्यांच्या पालकांना आवश्यकतेनुसार पशुवैद्यकीय मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून देऊ इच्छितो. नियमित, सक्रिय काळजी घेणे अधिक सोपे करणे आणि दैनंदिन पाळीव प्राणी संगोपन अधिक प्रभावी करणे, हा यामागील उद्देश आहे." पाळीव प्राण्यांच्या मालकांना त्यांच्या प्राण्यांच्या वागणुकीत, खाण्याच्या सवयींमध्ये, हालचालींमध्ये किंवा एकूणच आरोग्यामध्ये काही बदल दिसून येतात, परंतु त्यांना पशुवैद्याकडे जाण्याची गरज आहे की नाही, याबद्दल खात्री नसते, अशा वेळेला वर्षभर पशुवैद्यकीय सल्ला सहज उपलब्ध करून देणे हा या आरोग्य पॅकेजचा उद्देश आहे. या आरोग्य पॅकेजेसमध्ये अनेक सेवांचा समावेश एकाच वार्षिक योजनेत केला गेला आहे, ज्यामुळे पाळीव प्राण्यांच्या नियमित देखभालीबाबत मालकांना घ्याव्या लागणाऱ्या स्वतंत्र निर्णयांची संख्या कमी होण्यास मदत होते. या वार्षिक आरोग्य पॅकेजसाठी 1,640 रुपये प्रति महिना या दरापासून सुरू होणारा 12 महिन्यांचा ईएमआय (EMI) पर्याय उपलब्ध आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## बोरा महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**शिरूर : दैनिक संध्या**

शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे चांदमल ताराचंद बोरा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर, जिल्हा पुणे यांच्या भूगोल विभागाच्या वतीने शिरूर तालुक्यातील संपूर्ण गावांचे मृदा व जल परीक्षण, आरोग्य, ऊर्जा, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण तसेच शासकीय विविध योजना व विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिष्यवृत्ती यांची माहिती संकलित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचा शुभारंभ निमगाव भोगी येथून करण्यात आला. या प्रकल्पाच्या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक गावातील मृदा व जलसंपत्तीची शास्त्रीय माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच गावातील सामाजिक, आर्थिक, आरोग्य, ऊर्जा व शैक्षणिक परिस्थितीचा क्षेत्रीय सर्वेक्षणाद्वारे अभ्यास केला जाणार आहे. या माहितीच्या आधारे स्थानिक गरजा ओळखून शेती, जलव्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासासाठी योग्य नियोजन करण्यास मदत होणार आहे. प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी मृदा व जल परीक्षणाचे कृषी, पर्यावरण आणि ग्रामविकासाच्या दृष्टीने असलेले महत्त्व स्पष्ट केले. क्षेत्राधारित अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि महाविद्यालयातील ज्ञान व कौशल्याचा समाजाच्या विकासासाठी उपयोग होतो, असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव यांचेही प्रकल्पास मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. अतुल जेठे यांनी केले. यावेळी भूगोल विभागातील डॉ. एन. एस. पाडळकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आप्पासाहेब चव्हाण तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी डॉ. आयोध्या क्षीरसागर उपस्थित होते. प्रकल्पांतर्गत गावातील मातीची गुणवत्ता ,सुपीकता, व इतर जलस्रोतांच्या पाण्याची गुणवत्ता, जलसंपत्तीची उपलब्धता व वापर यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. मृदा परीक्षणाच्या आधारे पिकांची योग्य निवड, संतुलित खत व्यवस्थापन आणि मृदा संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती उपलब्ध होणार आहे. तसेच गावातील आरोग्य, ऊर्जा, आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे सर्वेक्षण करून नागरिकांना विविध शासकीय कल्याणकारी योजना आणि विद्यार्थ्यांना उपलब्ध शिष्यवृत्ती व शैक्षणिक योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

## राज्यातील २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर

**कवठे येमाई: दैनिक संध्या**

खरीप हंगाम २०२६ मधील पावसाची तूट आणि अन्य घटकांमुळे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याचे कृषी आयुक्तांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाने २५ सप्टेंबर २०२६ रोजी शासन निर्णय काढून या २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना व विविध सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार खरीप २०२६ मधील परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. कृषी आयुक्तांच्या २४ सप्टेंबर २०२६च्या अहवालानुसार २६५ तालुक्यांमध्ये Trigger-1 (प्रथम कळ) लागू झाल्याचे शासन निर्णयात नमूद आहे. दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमध्ये शासनाने विशेष बाब म्हणून खालील उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. जमीन महसुलात सूट,पीक कर्जाचे पुनर्गठन शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती,कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट; ७.५ हॉर्सपॉवरपर्यंतच्या पंपांचे वीजबिल आधीच माफ करण्यात आले असून त्यावरील पंपांना ही सूट लागू राहील.शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी,रोजगार हमी योजने अंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे,आवश्यक ठिकाणी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा,टंचाई जाहीर झालेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करणे,शेतीवर अवलंबून शेतकरी व मजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी व्यवस्था,जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे,जलसंधारणाची कामे सुरू करणे,पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे.



## श्रीनाथ पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत १४ टक्के लाभांश जाहीर

**लोणी काळभोर : दैनिक संध्या**

थेऊर फाटा ,कुंजीरवाडी येथील श्रीनाथ पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना १४ टक्के लाभांश व तसेच भेटवस्तू देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप धुमाळ यांनी दिली .

महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या श्रीनाथ पतसंस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा 'हॉटेल एस ४ जी येथे पार पडली. यावेळी उपस्थित सभासदांना मार्गदर्शन करताना संदीप धुमाळ बोलत होते. यावेळी सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमिताने पंचक्रोशीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा 'श्रीनाथ गुण गौरव पुरस्कार २०२६' देऊन गौरव करण्यात आला. त्याच बरोबर ज्येष्ठ सभासद ज्ञानेश्वर धुमाळ, गणेश आंबेकर यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष संभाजी आंबेकर, कार्यकारी संचालक ज्ञानेश्वर धुमाळ, संचालक महादेव धुमाळ, माजी सरपंच सचिन तुपे, परिस फाऊंडेशनच्या अध्यक्षा, माजी सरपंच सुनीता धुमाळ, वैशाली मेमाने, राहुल धुमाळ, दीपक खटाटे, सुभाष गाढवे, अजय कुंजीर, राजेंद्र गायकवाड, उमेश राखपसरे, विश्वनाथ रूपनर, पोपट चौधरी, दत्तात्रय कुंजीर, व्यवस्थापक शिवाजी जवळे आदी उपस्थित होते . यावेळी बोलताना संदीप धुमाळ पुढे म्हणाले श्रीनाथ पतसंस्थेला सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात १.५९ कोटी रुपये निव्वळ नफा झाला असून संस्थेच्या सभासंदाना १४ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. पतसंस्थेच्या ३१ मार्च २०२६ अखेर ४५ कोटी ९० लाख रुपयांच्या ठेवी, ३५कोटी ९२ लाख रुपयाचे कर्ज वाटप, तसेच २६ कोटी ४९ लाख रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. संस्थेचे एकूण खेळते भांडवल ६५ कोटी ३८ लाख असून संस्थेची वसुली ९२.२१ टक्के असून एनपीए टक्के आहे अशी माहिती संस्थापक अध्यक्ष संदीप धुमाळ यांनी दिली.

# परदेशी पर्यटकांनी अनुभवली महाराष्ट्राच्या संस्कृतीची जादू



**मुंबई (दै. संध्या)**

अनंत चतुर्दशीनिमित्त मुंबईतील ऐतिहासिक गिरगाव चौपाटीवर आयोजित गणेश विसर्जनाच्या भव्य सोहळ्याने परदेशी पर्यटकांना मंत्रमुग्ध केले. बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागासाठी दरवर्षीप्रमाणे उभारलेल्या विशेष दालनाद्वारे परदेशी पर्यटकांनी गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीचा थक्क करणारा अनुभव घेतला. तर, थायलंड येथून हा विसर्जन सोहळा अनुभवण्यास आलेल्या पर्यटकांनी आरतीतही सहभाग घेतला. यावेळी मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी पर्यटन विभागाने केलेल्या आयोजनाचे कौतुक केले.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस म्हणाले, "गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा राज्यउत्सव आहे. महाराष्ट्र पर्यटन विभागाने या उत्सवाला आंतरराष्ट्रीय स्वरुप दिले. आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने गणेश विसर्जन सोहळ्यामध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामध्ये एक वेगळाच उत्साह पाहायला मिळाला. विशेषतः येथील वातावरण व नियोजन पाहून आंतरराष्ट्रीय पर्यटक थक्क झाले. हजारो संख्येने लोक एकत्रित आल्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेला गणेश विसर्जन सोहळा अनुभवने या पर्यटकांसाठी आनंदाचा क्षण होता."

गणेश विसर्जन सोहळ्यास कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा, बृहन्मुंबईच्या महापौर श्रीमती रितू तावडे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे पर्यटन संचालनालयाचे संचालक श्री. विकास पानसरे (भा.प्र. से.), पर्यटन विभागाचे उप सचिव श्री. संतोष रोकडे, पर्यटन संचालनालयाचे सहसंचालक श्री. संतोष जाधव, पर्यटन संचालनालयाचे सहाय्यक संचालक श्री. सुशील पवार, श्री. रविंद्र पवार, पर्यटन संचालनालयाचे मुख्यलेखाधिकारी श्री. विठ्ठल सुडे, कार्यकारी अभियंता श्री. आकाश चकोर व संचालनालयाचे अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच महाराष्ट्र पर्यटनाच्या युवा दूत नवेली देशमुख उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी परदेशी पर्यटकांसह गणपती बाप्पाची आरती केली. गणेश विसर्जनाचा हा भव्य सोहळा 'याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी' आंतरराष्ट्रीय पर्यटकांनी उपस्थिती दर्शविली होती. तसेच थायलंड येथून हा विसर्जन सोहळा अनुभवण्यास आलेले पर्यटक आरतीमध्ये तल्लीन झाले. जगभरातील २३ देशांमधील आंतरराष्ट्रीय पर्यटक व पाहुण्यांनी सदर सोहळ्यामध्ये मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. या सोहळ्यानिमित्त आलेल्या या पर्यटकांना गणपती मिरवणुकीच्या भव्यतेचे दर्शन घडले. त्याचबरोबर त्यांना गणरायाची श्रद्धेने पूजा करणे, आरतीत सहभागी होणे आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सामील होण्याची संधी मिळाली. पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषेत सज्ज होऊन, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात हे पर्यटक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक श्रीमंतीमध्ये रमून गेले.

## एकाग्रता, निर्णयक्षमता आणि तार्किक विचारांना चालना

**उरुळी कांचन : (दै. संध्या)**

उरुळी कांचन (ता. हवेली) क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच पुणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हवेली तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा २०२६ उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या रविंद्र कला मंदिरात उत्साहात पार पडली. या स्पर्धेत हवेली तालुक्यातील २५ शाळांमधील तब्बल ३२९ मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



१४, १७ आणि १९ वर्षांखालील विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी बुद्धिबळाच्या पटावर आपल्या बौद्धिक कौशल्याचे दर्शन घडविले. प्रत्येक डावात विचारपूर्वक चाल खेळत विद्यार्थ्यांनी डावपेच, नियोजन, संयम आणि निर्णयक्षमतेचा उत्कृष्ट नमुना सादर केला. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महात्मा गांधी विद्यालयाच्या प्राचार्या संगीता शिर्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, "बुद्धिबळ हा केवळ खेळ नसून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणारे प्रभावी माध्यम आहे. या खेळामुळे एकाग्रता, निर्णयक्षमता, नियोजन, संयम आणि तार्किक विचार करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत होते." कार्यक्रमाच्या प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच भारतीय हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद आणि ऑलिंपिकवीर कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे उपप्राचार्य दादा यादव, पर्यवेक्षक पृथ्वीराज कड, सत्यवान जगताप, अविनाश कांबळे, स्पर्धेतील पंच, अध्यापकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजगुरुनगरात भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप डी.जे., ढोल-लेझीमच्या गजरात विसर्जन मिरवणुका

**राजगुरुनगर : (दै. संध्या)**

डी.जे सह ढोल-लेझीमच्या गजरात तसेच पारंपरिक वाद्यांच्या तालावर राजगुरुनगर शहरात उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यात आला. विविध सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गस्थ झाल्या. यावेळी गणेशभक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

शहरातील सुमारे ३१८ गणेश मंडळांपैकी १८ सार्वजनिक गणेश मंडळे विसर्जनाच्या रांगेत सहभागी झाली होती. यातील काही मंडळांनी पारंपरिक वाद्यांच्या तालावर तर काही मंडळांनी डी.जे.च्या तालावर गणरायाचे विसर्जन केले. यामुळे शहरात दिवसभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी एकविरा सार्वजनिक गणेश मंडळाने सादर केलेला 'आधुनिक तंत्रज्ञानाचा तरुण पिढीवर होणारा



परिणाम' हा ज्वलंत देखावा विशेष आकर्षण ठरला. सामाजिक संदेश देणाऱ्या या देखाव्याला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर राजगुरुनगर नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष व्यवस्था करण्यात आली होती. गणेशमूर्तींचे विसर्जन करताना निर्माल्य, फुले तसेच सजावटीचे साहित्य पाण्यात न टाकता उपलब्ध करून देण्यात आलेल्या निर्माल्य कलशात जमा करावे, असे आवाहन नगरपरिषदेकडून करण्यात आले होते. शहरात वाडा रोड पाण्याची टाकी, सातनळ-तिन्हेवाडी रोड, कॅनॉल क्रीडा संकुलाजवळ, थिगळस्थळ शाळेसमोर आणि भीमा नदी घाट या ठिकाणी विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेकडून यूपीआय, कार्ड, नेट बँकिंग आणि शाखांद्वारे थेट कर भरण्याची सुविधा उपलब्ध

**मुंबई: (दै. संध्या)**

सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्सेस (सीबीडीटी) कर संकलनासाठी आपल्या पेमेंट गेटवेचे इंटीग्रेशन पूर्ण केले आहे. यामुळे देशभरातील करदात्यांना विविध डिजिटल तसेच प्रत्यक्ष माध्यमांद्वारे प्रत्यक्ष कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

प्रत्यक्ष कर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि सुविधाजनक करण्यासाठी करदाते यूपीआय, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड तसेच आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मसह विविध पेमेंट पर्यायांचा वापर करू शकतात. ऑफलाइन पद्धतीने कर भरण्यास प्राधान्य देणारे करदाते आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेला भेट देऊन चेक, डिमांड ड्राफ्ट किंवा रोख रकमेच्या माध्यमातून कर भरू शकतात. याशिवाय, इतर बँकांचे

IDFC FIRST Bank

ग्राहकही आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या पेमेंट गेटवेद्वारे त्यांच्या संबंधित बँकांच्या इंटरनेट बँकिंग सुविधेचा वापर करून प्रत्यक्ष कराचा भरणा सहजपणे करू शकतात. हे इंटीग्रेशन करदात्यांसाठी त्यांच्या बँकेशी असलेल्या संबंधाची पर्वा न करता कर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि सुविधाजनक करण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. ग्राहकांना चलान आणि कर भरण्याची पुष्टी यासंबंधित कागदपत्रे सहजपणे पाहता तसेच डाउनलोड करता येतील. आयडीएफसी फर्स्ट बँकेचे रिटेल लायबिलिटीज, कार्ड्स आणि पेमेंट्स विभागाचे प्रमुख श्री. शिरीष भंडारी म्हणाले, ग्राहकांना आज त्यांच्या पेमेंटसाठी लवचिकता आणि त्यांच्या पसंतीनुसार पर्याय अपेक्षित असतात. या इंटीग्रेशन मुळे करदाते सुरक्षित आणि अखंड प्लॅटफॉर्मद्वारे यूपीआय, इंटरनेट बँकिंग, डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड यापैकी त्यांच्या पसंतीच्या पेमेंट पद्धतीचा वापर करून कर भरू शकतात. ग्राहकांसाठी अनुकूल डिजिटल बँकिंग सोल्यूशन्स विकसित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेच्या दिशेने हे आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. सीबीडीटी च्या वतीने प्रत्यक्ष कर भरणा स्वीकारण्यासाठी अधिकृत असलेल्या खासगी क्षेत्रातील बँकांपैकी एक म्हणून, आयडीएफसी फर्स्ट बँक आपल्या डिजिटल पेमेंट्स पायाभूत सुविधांना सातत्याने अधिक सक्षम करत आहे. तसेच, व्यक्ती आणि व्यवसायांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या बँकिंग सुविधा आणि उपाययोजना उपलब्ध करून देत आहे.



## मॅजेस्टिक सिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्य निवडणुकीत चष्मा पॅनलचे वर्चस्व

**पुणे : (दै. संध्या)**

बकोरी फाटा, वाघोली येथील मॅजेस्टिक सिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्य निवडणुक सन 2026-27 ते 2031-32 निवडणुकीत चष्मा या चिन्हाचे पॅनल विजयी झाले.

मॅजेस्टिक सिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे चेअरमन संजय सातव आप्पा यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविण्यात आली. या निवडणुकीत अनुक्रमे खालीलप्रमाणे उमेदवार मताधिक्याने निवडून आले. सातव संजय अमृतराव (१९८), विजन अंकित सतिष (१९६), थोरात योगेश अनिल(१९१), माथूर रमेश(१८९), जैन अचल विजय(१८८), गोसावी गणेशगीर दशरथगीर (१८७), हंचाटे श्रीवल्लभ सी (१८७), मिश्रा प्रशांत कुमार(१८७), निबरड मनोहर परशराम (१८६), अंभोरे महेश प्रभाकर (१८५), चेडे प्रशांत सुखदेव (१८५), कुलकर्णी उदयकुमार श्रीधरराव (१७९), म्हेत्रे विरेंद्र कांतिलाल (१७९), वाघ गजानन शंकरराव (१७९) या प्रमाणे चष्मा या चिन्हावर उमेदवार विजयी झाले.

# प्रेम, नकार आणि सत्याचा शोध घेणारी 'पूजा मेरी जान' २ ऑक्टोबरला झी५वर

**पुणे (दै. संध्या)**

प्रेम, नकार, संमती, वेड आणि सामाजिक निर्णय यांच्या विविध पैलूंना स्पर्श करणारी 'पूजा मेरी जान' ही वेधक कथा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. नवज्योत गुलाटी दिग्दर्शित आणि दिनेश विजन व अमर कौशिक निर्मित मॅडॉक फिल्म्सची ही निर्मिती हिंदी भाषेत २ ऑक्टोबर २०२६ रोजी झी५ या वाहिनीवर प्रदर्शित होणार आहे. मृणाल ठाकूर, हुमा कुरेशी, विक्रम सिंग चौहान आणि विजय राज यांच्या प्रमुख भूमिका या चित्रपटात आहेत.

प्रत्येक कथा ही सरळ आणि सोपी उत्तरे देण्यासाठीच असते असे नाही. काही कथा प्रेक्षकांना अस्वस्थ करणारे प्रश्न विचारतात, आपल्या धारणा तपासायला भाग पाडतात आणि ज्या सत्यापासून आपण दूर पळण्याचा प्रयत्न करतो, त्याच्याशी सामना घडवून आणतात. 'पूजा मेरी जान' हीदेखील अशाच स्वरूपाची कथा असल्याचे निर्मात्यांकडून सांगण्यात आले आहे.

चित्रपटाची कथा पूजा या तरुणीभोवती फिरते. आपल्या जवळच्या मित्राचे प्रेम नाकारण्याचा तिचा निर्णय घेतल्यानंतर अस्वस्थ करणाऱ्या घटनांची मालिका सुरू होते. कथा पुढे सरकत असताना नेमके काय घडले, त्यामागे कोण जबाबदार आहे आणि पूजा या परिस्थितीची बळी आहे की तिच्या सभोवतालच्या घटनांशी तिचा काही सखोल संबंध आहे, असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

हुमा कुरेशीने साकारलेली सना ही व्यक्तिरेखा या कथेला कायदेशीर दृष्टिकोनातून पुढे नेते. ती संपूर्ण प्रकरणाचा मागोवा घेत पूजाभोवतीच्या परिस्थितीची जुळवाजुळव करण्याचा आणि परस्परविरोधी घटनांमागील




सत्य शोधण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे कथा जसजशी उलगडत जाते, तसतसे निर्दोषपणा, जबाबदारी, संमती आणि सामाजिक निर्णय यांच्यातील गुंतागुंतीचे संबंध समोर येतात.

मृणाल ठाकूरने पूजाची भूमिका साकारली आहे. या व्यक्तिरेखेतील विविध कंगोरे आणि भावनिक छटा शोधण्याची संधी मिळाल्याने ही भूमिका आपल्यासाठी विशेष असल्याचे तिने सांगितले. प्रेक्षकांनी स्वतः या कथेचा मागोवा घेत पूजाचा प्रवास समजून घ्यावा आणि नातेसंबंध, नकार, संमती तसेच समाजाच्या निर्णयप्रक्रियेविषयी प्रश्न विचारावेत, अशी अपेक्षाही तिने व्यक्त केली. हुमा कुरेशीच्या मते, 'पूजा मेरी जान'ची वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे कथा एका दृष्टिकोनातून न मांडता परिस्थितीचे अनेक पैलू समोर आणते. सना ही व्यक्तिरेखा कायदेशीर दृष्टिकोनातून घटनांचा मागोवा घेते. धारणा एखाद्या व्यक्तीविषयीच्या आपल्या आकलनाला कशा प्रकारे आकार देतात आणि सत्य व गृहीतके यांच्यातील फरक ओळखणे किती कठीण असते, याचा शोध या कथेत घेतला जात असल्याचे तिने सांगितले. विक्रम सिंग चौहाननेही या कथेच्या वेगळेपणाचा उल्लेख केला. एखाद्या परिस्थितीतील व्यक्ती किंवा घटना आपल्याला खरोखर किती माहिती असतात, असा प्रश्न ही कथा प्रेक्षकांसमोर ठेवते. नातेसंबंध, नकार आणि वैयक्तिक सीमांची चाचणी झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या भावनांचा शोध या कथेत घेतला जातो. कथा पुढे जाताना प्रेक्षकांचा दृष्टिकोनही बदलत राहतो आणि जे सत्य वाटते ते प्रत्यक्षात तसेच आहे का, याचा विचार करण्यास भाग पाडते, असे चौहानने सांगितले. नकार, वेड, संमती, जबाबदारी, न्याय आणि सामाजिक निर्णय या विषयांना केंद्रस्थानी ठेवणारी 'पूजा मेरी जान' प्रेक्षकांना सोपी उत्तरे देण्याऐवजी अनेक प्रश्नांसमोर उभी करणार आहे. बदलत्या दृष्टिकोनातून रहस्य उलगडत जाणारी ही कथा २ ऑक्टोबरपासून हिंदी भाषेत झी५वर पाहता येणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




## बॅडमिंटन स्पर्धेत डीवायपीसीओइ, आकुर्डी आणि पीसीसीसीएस, चिंचवड विजयी

**पिंपरी,: दैनिक संध्या**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय निगडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धेत मुलांच्या गटामध्ये अंतिम स्पर्धेत डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, आकुर्डी संघाने पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी संघाचा ३ विरुद्ध १ या गुण फरकाने विजय मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तर मुलींच्या गटामध्ये अंतिम स्पर्धेत प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कम्प्युटर सायन्स, चिंचवड संघाने पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय, निगडी संघाचा २ विरुद्ध ० गुण फरकाने विजय मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे पीसीसीओई येथील स्पोर्ट कॉम्प्लेक्स मध्ये उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. अक्षय काशीद व डॉ. गणेश चव्हाण, एसपीपीयुचे अधिसभा सदस्य डॉ. रमेश गायकवाड आदी उपस्थित होते. मुलांच्या स्पर्धेमध्ये पुणे जिल्ह्यातील ३५ संघांनी आणि मुलींच्या स्पर्धेत २९ संघांनी सहभाग घेतला होता. पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, डीन एसडीडब्ल्यू डॉ. पद्माकर देशमुख, स्पर्धेचे समन्वयक पीसीसीओईचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष पाचारणे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. स्पर्धेच्या मुले व मुली स्पर्धेच्या प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविलेल्या संघांना स्पर्धा आयोजक पीसीसीओई महाविद्यालयाच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सर्व विजेत्या संघांचे पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. तत्पूर्वी झालेल्या उपांत्य सामन्यांमध्ये मुलांच्या गटात पीसीसीओई, निगडी संघाने एसएई, कोंढवा संघाला व डीवायपीसीओइ, आकुर्डी संघाने पीसीसीओईआर रावेत संघाला नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तसेच मुलींच्या गटात पीसीसीओई, निगडी संघाने पीसीसीओईआर, रावेत व पीसीसीसीएस, चिंचवड संघाने एएलसी, कान्हे संघाला नमवून अंतिम सामन्यात प्रवेश केला. स्पर्धेचा अंतिम निकाल मुले विभाग प्रथम :- डीवायपीसीओइ, आकुर्डी; द्वितीय :- पीसीसीओई, निगडी आणि तृतीय क्रमांक : पीसीसीओईआर, रावेत या संघाने मिळवला. मुलीच्या विभागात प्रथम क्रमांक पीसीसीसीएस, चिंचवड; द्वितीय क्रमांक :- पीसीसीओई, निगडी आणि तृतीय क्रमांक :- एएलसी, कान्हे या संघाने मिळवला.

## निगडी येथे पोलिस कर्मचाऱ्याची आत्महत्या; पिस्तुलातून गोळी झाडून जीवन संपवले

**पिंपरी : दैनिक संध्या**



पिंपरी-चिंचवड पोलिस दलातील कर्मचारी विजय कोळी यांनी सरकारी पिस्तुलातून डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असलेल्या कोळी यांचा मृतदेह आज सकाळी निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथील बस डेपो परिसरात आढळून आला. मिळालेल्या माहितीनुसार, विजय कोळी हे पिंपरी-चिंचवड पोलिस दलात कार्यरत होते. कौटुंबिक वादातून ते दोन दिवसांपूर्वी घरातून निघून गेले होते. घरातून बाहेर पडताना त्यांनी शासकीय पिस्तूल सोबत घेतल्याने पोलिस दलाने त्यांचा शोध सुरू केला होता. कोळी यांचे शेवटचे लोकेशन निगडीतील दुर्गादेवी टेकडी परिसरात आढळून आल्याने त्या भागात मोठ्या प्रमाणात शोधमोहीम राबविण्यात आली. ड्रोनच्या साहाय्यानेही परिसराची तपासणी करण्यात आली होती. मात्र, त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागत नव्हता. आज सकाळी निगडी ट्रान्सपोर्ट नगर येथील बस डेपो परिसरात त्यांचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक तपासात त्यांनी शासकीय पिस्तुलातून स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाले आहे. विजय कोळी हे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे RTPC म्हणून कार्यरत होते. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड पोलिस दलात हळहळ व्यक्त करण्यात येत असून, पोलिस पुढील तपास करीत आहेत.



## अनुप मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त अंध दिव्यांगांसाठी स्नेहभोजन व छत्री वाटप

**निगडी : दैनिक संध्या**

भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त निगडी येथील सिद्धिविनायक गणेश मंदिरात अंध व दिव्यांग बांधवांसाठी स्नेहभोजन आणि छत्री वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात सुमारे दोनशे अंध व्यक्तींनी उपस्थिती लावली. उपस्थितांसाठी अन्नदान व स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गरजू दिव्यांगांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम सचिन काळभोर (भारतीय जनता पार्टी कार्यकर्ता) यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवकुमार बायस (क्षत्रिय राजपूत संघटना, महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष), प्रविण पायाळ, गौरव रौधाळे, राकेश सिंह, राजू लक्ष्मण काळभोर, उद्योजक बंडू भाऊ लवगे, मुन्ना बेग, फिरोज शेख, सचिन शिंदे, जयदेव भुवड, जगदीश चौधरी, फुआराम चौधरी, रफिक शेख, अविनाश साळवे, बबन दळवी आणि अफसर मुलाणी यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समाजातील गरजू आणि दिव्यांग बांधवांप्रती संवेदनशीलता जपण्याचे आवाहन केले. वाढदिवसासारख्या आनंदाच्या क्षणाचे समाजोपयोगी कार्यात रूपांतर करून अनुप मोरे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.




# भोसरी परिसरात गणेश विसर्जन मिरवणूक उत्साहात

■ **पिंपरी : (दै. संध्या)**

भोसरी परिसरातील गणेश मंडळांच्या गणेशमूर्तींची विसर्जन मिरवणूक गुरुवार, दि. २४ सप्टेंबर रोजी उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि शांततामय वातावरणात पार पडली. ढोल-ताशा, ढोल-लेझीम, पारंपरिक वाद्ये तसेच डीजेच्या गजरात गणरायाचा जयजयकार करत गणेशभक्त मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भोसरी येथील बापूजी बुवा चौकात गणेश विसर्जन मिरवणुकीतील मंडळांच्या स्वागतासाठी भव्य स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. या ठिकाणी गणेश मंडळांच्या अध्यक्षांचा सहाय्यक अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि कार्यकारी अभियंता किरण अंदुरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

भोसरी येथील स्वागत कक्षाच्या ठिकाणी पहिली गणेश विसर्जन मिरवणूक दुपारी दीड वाजेच्या सुमारास दाखल झाली. वीर हनुमान मित्र मंडळ, भोसरी गावठाण या मंडळाने विसर्जन मिरवणुकीला सुरुवात केली. त्यानंतर विविध गणेश मंडळांच्या मिरवणुका मार्गस्थ झाल्या. शेवटची गणेशमूर्ती विघ्नहर्ता मित्र मंडळ, विठ्ठल नगर, लांडेवाडीची गणेश विसर्जन मिरवणूक भोसरी येथील स्वागत कक्षाच्या ठिकाणाहून पुढे मार्गस्थ झाली.

या विसर्जन मिरवणुकीत वीर हनुमान मित्र मंडळ, लोंढे तालीम मित्र मंडळ, श्री कानिफनाथ मित्र मंडळ, नव महाराष्ट्र तरुण मंडळ, हिंदवी स्वराज्य तरुण मित्र मंडळ अँड ट्रस्ट, फुगे माने तालीम मंडळ, धर्मवीर संभाजी मित्र मंडळ, छत्रपती श्री शिवाजी तरुण मित्र मंडळ, कै. दामू शेठ गव्हाणे मित्र मंडळ, लांडगे लिंबाची तालीम मंडळ, नरवीर तानाजी मित्र मंडळ, पठारे लांडगे तालीम व्यायाम मंडळ, जय मल्हार मित्र मंडळ, खंडोबा मित्र मंडळ, मधले फुगे तालीम मंडळ, अष्टविनायक मित्र मंडळ, गव्हाणे तालीम मित्र मंडळ, भगवान गव्हाणे मित्र मंडळ, विनर्स मित्र मंडळ, नाथसाहेब प्रतिष्ठान, महात्मा फुले मित्र मंडळ, भोलेश्वर मित्र मंडळ, युवा सारथी मित्र मंडळ आणि विघ्नहर्ता मित्र मंडळ आदी गणेश मंडळांनी सहभाग घेतला.

मिरवणुकीदरम्यान विविध गणेश मंडळांनी सादर केलेले आकर्षक रथ, देखावे आणि पारंपरिक वाद्यवृंदांनी गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेतले. छत्रपती श्री शिवाजी तरुण मंडळाच्या राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या रथाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले. पठारे लांडगे लिंबाची तालीम व्यायाम मंडळाचा विद्युत रोषणाईने सजवलेला रथही आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. लांडेवाडी येथील नव महाराष्ट्र तरुण मंडळाने जगन्नाथ रथासह पारंपरिक केरळी कलाकारांच्या वाद्यवृंदासह काढलेल्या मिरवणुकीने उत्साहात भर घातली.

गणेश मंडळांचे स्वागत करण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता किरण अंदुरे यांच्यासह कार्यालयीन अधीक्षक शिवाजी खेडेकर, कार्यकारी अभियंता बाळू लांडे, उपअभियंता राजीव गाटुले, नीलेश केदार, कनिष्ठ अभियंता राधवेंद्र धर्मा कांबळे, मुख्य लिपिक धर्मा गंभीर, इस्माईल शेख, किशोर केदारी, प्रदीप गायकवाड, उमेश जगताप, जयश्री भागवत, राधिका पिंगळे, विद्या कवडे, भानुदास तापकीर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आवश्यक नागरी सुविधा, स्वच्छता, निर्माल्य संकलन तसेच नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. भोसरी पोलीस, वाहतूक शाखा, सीआरपीएफचे जवान तसेच संबंधित क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मिरवणूक सुरळीत आणि शांततेत पार पडण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडली. गणेश विसर्जन मिरवणुक स्वागत कक्षामध्ये सूत्रसंचालन किशोर केदारी यांनी केले.

## गणेशोत्सवात पुणे मेट्रोला अभूतपूर्व प्रतिसाद



■ **पिंपरी (दै. संध्या)**

यंदाच्या गणेशोत्सवात प्रवाशांनी आणि भाविकांनी प्रवासासाठी पुणे मेट्रोला अभूतपूर्व पसंती दर्शवली आहे. गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासून म्हणजेच १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२६ या १२ दिवसांच्या संपूर्ण कालावधीत तब्बल ४८,३२,९१५ प्रवाशांनी मेट्रोने प्रवास केला. या १२ दिवसांच्या कालावधीत पुणे मेट्रोला ७,४९,२८,३७७ रुपये इतके महसुली उत्पन्न प्राप्त झाले आहे.

अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीच्या दिवशी, २५ सप्टेंबर सकाळी ६ ते २६ सप्टेंबर सकाळी ६ या २४ तासांत ५,८०,२८० प्रवाशांनी मेट्रो सेवेचा लाभ घेतला असून एकाच दिवसात ८५,६१,८९५ रुपयांचे उत्पन्न मेट्रोला मिळाले आहे. पुणे मेट्रोच्या प्रवाशांच्या संख्येत गेल्या दोन वर्षांत (२०२४ ते २०२६) ऐतिहासिक आणि मोठी वाढ झाली आहे. २०२४ च्या गणेशोत्सवात मेट्रोने प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या २०,४५,१०० इतकी होती, जी २०२५ मध्ये वाढून ३७,१७,५७८ वर पोहोचली. तर यंदा २०२६ च्या गणेशोत्सवात हाच आकडा ४८,३२,९१५ प्रवाशांवर पोहोचला आहे. गेल्या दोन वर्षांतील आकडेवारीची तुलना केल्यास, २०२५ च्या तुलनेत यंदा २०२६ मध्ये प्रवासी संख्येत २९.९९% (सुमारे ३०%) ची लक्षणीय वाढ नोंदवली गेली आहे. तसेच, २०२४ च्या तुलनेत २०२६ च्या गणेशोत्सव कालावधीतील एकूण प्रवासी संख्येत तब्बल १३६.३२% ची अवाढव्य वाढ झाली असून पुणे मेट्रोची प्रवासी संख्या गेल्या दोन वर्षांत दुप्पटीहून अधिक झाली आहे

गणेशोत्सवाच्या १२ दिवसांत ७१% प्रवाशांनी डिजिटल तिकिट प्रणालीचा वापर केला, तर २९% प्रवाशांनी कागदी तिकीट खरेदी केले. यामध्ये एकूण ८६% प्रवाशांनी डिजिटल पद्धतीने (Online/UPI/Card) पेमेंट केले, तर १४% प्रवाशांनी रोख रक्कमेचा वापर केला.

गणेश विसर्जनाच्या दिवशी तब्बल ११ मेट्रो स्थानकांवर प्रत्येकी २० हजारांहून अधिक प्रवाशांची प्रवास केला. यामध्ये महात्मा फुले मंडई स्थानक ७०,३७५ प्रवासी व रु. ९,४६,२३५ उत्पन्नासह अग्रस्थानी राहिले. त्यापाठोपाठ डेक्कन जिमखाना ६४,९३८ प्रवासी (रु. ७,५४,१२९), स्वारगेट ४८,९०६ प्रवासी (रु. ६,३४,९१२), पीसीएमसी ४३,४९१ प्रवासी (रु. ९,२४,९२४), रामवाडी ३७,८९४ प्रवासी (रु. ६,६८,०७७) आणि पीएमसी स्थानकात ३६,५८८ प्रवाशांची नोंद झाली. तसेच वनाज ३०,६८६, नळ स्टॉप ३०,५१९, गरवारे कॉलेज २६,८३२, छत्रपती संभाजी महाराज उद्यान २३,३५० आणि पुणे रेल्वे स्टेशन स्थानकात २०,१४९ प्रवाशांनी प्रवास केला.

## पिंपरी चिंचवडमध्ये ध्वनी प्रदूषण करणाऱ्या ९१ मंडळांवर गुन्हे दाखल



■ **पिंपरी (दै. संध्या)**

गणेशोत्सवादरम्यान ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांविरोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. 14 सप्टेंबर ते 26 सप्टेंबर 2026 या कालावधीत शहरात ध्वनीप्रदूषणासंदर्भात एकूण 91 गुन्हे दाखल करण्यात आले असून, 86 मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या आकडेवारी नुसार, परिमंडळ 1 मध्ये सर्वाधिक 29 गुन्हे दाखल झाले असून 28 मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिमंडळ 2 मध्ये 44 गुन्हे दाखल करण्यात आले असून सर्व 44 प्रकरणांमध्ये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परिमंडळ 3 मध्ये 8 गुन्हे दाखल करून 8 मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तर परिमंडळ 4 मध्ये 10 गुन्हे दाखल झाले असून 6 मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

परिमंडळनिहाय कारवाईमध्ये निगडी, चिंचवड, पिंपरी, सांगवी, संत तुकारामनगर, दापोडी, बावधन, काळेवाडी, हिंजवडी, वाकड, भोसरी, चाकण दक्षिण, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, दक्षिण महाळुंगे एमआयडीसी आणि शिरगाव पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील प्रकरणांचा समावेश आहे. गणेशोत्सव काळात ध्वनीप्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांकडून करण्यात आलेल्या या कारवाईमुळे उत्सवाच्या काळात ध्वनिक्षेपक आणि इतर ध्वनीवर्धक साधनांच्या वापरावर पोलिसांचे लक्ष असल्याचे स्पष्ट झाले आहे. एकूण : ९१ गुन्हे, डीजे स्पीकर वाहने असे एकूण ८६ मुद्देमाल जप्त.

# रोजगार महाकुंभातून मिळणार करिअरच्या नव्या संधी – आमदार जगताप

■ **पिंपरी (दै. संध्या)**

नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींसाठी 'रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६' आयोजित करण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी त्वरित नोंदणी करून रोजगाराची संधी मिळवण्यासाठी महाकुंभात सहभागी व्हावे," असे आवाहन चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी केले आहे.

वैश्विक नेतृत्व, देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त हा रोजगार मेळावा मंगळवार, २९ सप्टेंबर २०२६ रोजी दि न्यू मिलेनियम इंग्लिश मीडियम स्कूल, नवी सांगवी येथे होणार आहे.या रोजगार महाकुंभात विविध क्षेत्रांतील नोकरीच्या संधींची माहिती, कंपन्यांशी थेट संवाद आणि रोजगार मार्गदर्शन उपलब्ध होणार असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले.

करिअरची पुढील दिशा ठरवण्यासाठी आवश्यक माहितीही युवक-युवतींना एकाच ठिकाणी मिळणार आहे. इच्छुक तरुण तरुणींनी अधिक माहितीसाठी 99210 99214, 73500 79955 किंवा 75759 81111 या क्रमांकावर तसेच https://docs.google.com/forms/d/1Ac8em2RstBW6zH6n9vO2k6trJKHABEGRqRm7KCFiogg/viewform?edit_requested=true या लिंकवर नावनोंदणी करावी आणि कार्यक्रमाला येताना आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत असे आवाहन आयोजकांनी केले आहे. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील आपल्या तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्यानुसार रोजगाराच्या सर्वोत्तम संधी एकाच छताखाली उपलब्ध व्हाव्यात, हा या 'रोजगार महाकुंभा'चा मुख्य उद्देश आहे. नामांकित कंपन्यांशी थेट संवाद साधून स्वतःच्या करिअरला नवी दिशा देण्याचे हे एक प्रभावी व्यासपीठ ठरेल. परिसरातील सर्व पात्र आणि इच्छुक युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे शंकर जगताप आमदार,चिंचवड विधानसभा मतदारसंघ यांनी सांगितले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रौष्ठपदी पौर्णिमा उत्साहात साजरी

**पुरंदर : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील श्रीक्षेत्र नायगाव येथे प्रौष्ठपदी पौर्णिमा उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त भाविकांनी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांचे दर्शन घेतले. प्रौष्ठपदी पौर्णिमेनिमित्त पहाटे पांडेश्वर येथून ग्रामस्थांनी आणलेल्या कऱ्हेच्या पाण्याने श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना अभिषेक व स्नान घालण्यात आले. यानंतर ह.भ.प. बाजीराव महाराज पाटील (कोल्हापूर) यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. किर्तनात महाराजांनी विविध दृष्टांत व उदाहरणांच्या माध्यमातून भाविकांना मार्गदर्शन केले. कीर्तनास आबा महाराज बोरकर,मोरे महाराज,कांबळे महाराज व चांगण महाराज यांनी साथ दिली तर मृदुंगाची साथ तेजस खेसे यांनी केली. भजनाची साथ नायगाव भजनी मंडळाने दिली. विणेकरी म्हणून ह.भ.प. अशोक होले यांनी सेवा बजावली. श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आकर्षक महापूजा पुजारी दिपक जगताप यांनी केली.यावेळी लक्ष्मण वाळके,रघुनाथ वाळके, अतुल वाळके, आत्माराम वाळके,ज्ञानेश्वर धर्माधिकारी,हिरामण येवले (पेरणे), विश्वनाथ लवांड (हिंगणी गाडा), अशोक गदादे (तांदळी), राजेंद्र कड (नायगाव) यांच्या वतीने अन्नदान करण्यात आले. प्रौष्ठपदी पौर्णिमेनिमित्त मंदिर परिसरात स्वच्छता,विद्युत रोषणाई,पाणीपुरवठा, दर्शनबारी आदींची उत्तम व्यवस्था श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ नायगाव यांच्या वतीने करण्यात आली होती,आशी माहिती राहुल कड यांनी दिली.

### मालमत्ता धारकांना कर भरण्यास मुदत

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण नगरपरिषद हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना कर भरण्यास येत्या ३० सप्टेंबर पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम १९६५ च्या तरतुदीनुसार सन २०२६ - २०२७ या आर्थिक वर्षातील पहिल्या सहा महिन्याचा मालमत्ता कर भरण्याची शेवटची ३० सप्टेंबर ही वाढीव मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मालमत्ता कर भरल्यास पहिल्या सहा महिन्याच्या मालमत्ता करास दरमहा दोन टक्के शास्ती, व्याज नियमानुसार आकारण्यात येणार आहे. मालमत्ता धारकांना व नागरिकांना कळविण्यात आले आहे की, सर्व मालमत्ता धारकांनी पहिल्या सहा महिन्याचा मालमत्ता कर सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत भरणे अपेक्षित आहे.

### शारदाबाई पवार महाविद्यालय शारदानगर मध्ये विद्यार्थी मंडळाची निवडणूक संपन्न

**बारामती : दैनिक संध्या**

शारदाबाई पवार कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2026 -27 मधील विद्यार्थी मंडळाची निवडणूक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली .विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, नेतृत्वगुणांना वाव मिळावा आणि महाविद्यालय प्रशासनातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने ही निवडणूक प्रक्रिया राबवण्यात आली. महाविद्यालयातील सर्व शाखेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मतदानातून महाविद्यालयाचा जनरल सेक्रेटरी(G.S).या पदासाठी प्रत्यक्ष मतदान दिनांक 23 सप्टेंबर रोजी सकाळी 11 ते 2 या वेळात घेण्यात आले. त्यानंतर अडीच वाजता एकत्रित मतांची मोजणी करण्यात करण्यात आली त्यासाठी तीन उमेदवार रिंगणात उभे होते त्यामधून श्री समी मुद्दसर शेख M.Sc. II या विद्यार्थ्याने 'जनरल सेक्रेटरी' पदी निवडणूक बहुमताने जिंकली त्याचबरोबर गुणवत्तेनुसार निवडलेल्या प्रत्येक वर्ग प्रतिनिधी मधून विद्यार्थी मंडळाचा अध्यक्ष व सचिव या दोन पदासाठी निवडणूक घेण्यात आली .या मधून अध्यक्ष म्हणून कु.अंकिता अनिल शिंदे तर सचिव पदावर कु.श्रावणी चंद्रकांत मोरे या बहुमताने निवडून आल्या यावेळी विद्यार्थी मंडळाची संपूर्ण निवडणूक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने पार पडली.



**पुढच्या वर्षी लवकर या...** दहा दिवसाच्या मुक्कामानंतर जगत मंगलमूर्ती गणपती रायाला घरोघरी निरोप देण्यात आला जेजुरीच्या होळकर तलाव परिसरातील विसर्जन दृश्य (फोटो -विजयकुमार हरिश्चंद्रे )



# चाकणला दहा हजार गणेश मूर्तींचे संकलन

■ **चाकण (दै. संध्या)**

चाकण नगरपरिषदेमार्फत गणेशोत्सव विसर्जनाची पर्यावरणपूरक व्यवस्था करण्यात आली होती. सुमारे दहा हजार गणेशमूर्तींचे संकलन करून विसर्जन करण्यात आले.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने गणेशमूर्तींचे संकलन व विसर्जन करण्यासाठी शहरातील १४ संकलन केंद्रे तसेच वाकी, आंबेठाण व राक्षेवाडी येथील ३ विसर्जन केंद्रांवर विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती. येथील नागरिकांना गणेशमूर्तींचे विसर्जन सुरक्षित, सुलभ व पर्यावरणपूरक पद्धतीने करता यावे, यासाठी नगरपरिषदेच्या वतीने नियोजन करण्यात आले होते. सदर गणेशोत्सव विसर्जन व्यवस्थेअंतर्गत १४ संकलन केंद्रांवर अंदाजे १,००० गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. वाकी, आंबेठाण व राक्षेवाडी येथील ३ विसर्जन केंद्रांवर अंदाजे ९,००० गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यामध्ये ६ फूटांपेक्षा अधिक उंचीच्या ११ गणेशमूर्तींचा समावेश होता. विसर्जनासाठी प्राप्त झालेल्या गणेशमूर्तींपैकी अंदाजे ८,००० ते ८,५०० गणेशमूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या, तर अंदाजे १००० ते १५०० गणेशमूर्ती शाडू मातीच्या होत्या. गणेशोत्सव विसर्जनाच्या काळात नागरिकांची गर्दी, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता तसेच विसर्जन स्थळांवरील सुरक्षितता याबाबत आवश्यक ती व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जन केंद्रांवर स्वच्छता व निर्माल्य संकलनाची व्यवस्था ठेवण्यात आली होती. तसेच विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती.चाकण नगरपरिषदेच्या वतीने गणेशोत्सव विसर्जन प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्व गणेश मंडळांचे, नागरिकांचे, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे तसेच पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. पुढील वर्षी अधिकाधिक नागरिकांनी शाडू मातीच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा, तसेच प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचा वापर टाळून पर्यावरण संवर्धनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन चाकण नगरपरिषदेच्या वतीने मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी केले. निसर्गाचे संरक्षण व जलप्रदूषण रोखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने पार पाडावी. शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर, नैसर्गिक सजावट व पर्यावरणपूरक विसर्जन पद्धतींचा अवलंब करून आगामी गणेशोत्सव अधिक पर्यावरणपुरक करण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग घ्यावा." असे डॉ.अंकुश जाधव, मुख्याधिकारी, नगरपरिषद चाकण यांनी सांगितले.

## चाकणला चवळी, लिंबू, हिरव्या मिरचीची विक्रमी आवक होऊनही भाव कडाडले

■ **चाकण (दै. संध्या)**



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये चवळी, गाजर, लिंबू, फरशी व हिरव्या मिरचीची विक्रमी आवक होऊनही त्यांचे भाव कडाडले आहेत. पालेभाज्यांची किरकोळ आवक झाली. एकूण उलाढाल ५ कोटी ७० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार ०५० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ४,६७५ रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक २,००० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला कमाल भाव १८ हजार रुपये मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला २ हजार ५०० रुपयां पासून ते ३ हजार ५०० रुपयांपर्यंत कमाल भाव मिळाला.

* शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे कांदा - एकूण आवक - १,०५० क्विंटल. भाव क्रमांक - १. ४,६७५ रुपये, भाव क्रमांक २. ३,००० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - २,००० क्विंटल.भाव क्रमांक १. १,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.७०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - ४०३ क्विंटल (८०० ते १,६०० रू.), कोबी - २२९ क्विंटल (५०० ते १,००० रू.), फ्लॉवर - १०३ क्विंटल (१,२०० ते १,८०० रु.), वांगी - ८५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), भेंडी - ११६ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), दोडका - ५८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), कारली - ७३ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ४८ क्विंटल (१,००० ते १,८०० रु.), काकडी - ७८ क्विंटल (८०० ते २,००० रु.), फरशी - ६४ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ६० क्विंटल (१,५०० ते ३,००० रुपये), ढोबळी मिरची - ११२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), चवळी - ३४ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), शेवगा - ३० क्विंटल (३,००० ते ४,५०० रु.), गाजर - ८० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - १८३ क्विंटल (२,००० ते ४,५०० रु. ), आले - ७२ क्विंटल (८,००० ते १३,००० रु. ), वाटाणा - १२५ क्विंटल (४,००० ते ७,००० रु.),.

## खेड पंचायत समितीचा कोण होणार बाजीगर

### सभापती व उपसभापतींची ५ ऑक्टोबरला निवड

■ **चाकण (दै. संध्या)**





प्रचंड टोकाचे राजकारण असलेल्या खेड पंचायत समितीच्या सभापती विद्या सयाजी मोहिते पाटील व उपसभापती मंगेश गुलाबराव सावंत यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने स्वखुशीने राजीनामा दिला आहे. त्या दोघांचे राजीनामे मंजूर झाले असून, आता नव्याने खेड पंचायत समितीचा कोण होणार बाजीगर या चर्चेला उधाण आले आहे. खेड येथे सोमवारी (दि.५ ऑक्टोबर) या दोन्ही पदांची निवड होणार आहे.

खेड तालुक्याच्या राजकारणात या दोन्ही पदांच्या राजीनाम्यामुळे पुन्हा एकदा टोकाची रणधुमाळी नागरिकांना पाहायला मिळणार आहे. एकीकडे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रतिनिधी निवडीची लगबग सुरू असताना खेड पंचायत समितीच्या या दोन्ही पदांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असल्याने राजकीय रंगत वाढली आहे. सहा महिन्यांपूर्वी झालेल्या खेड पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसेना उद्धव ठाकरे गट या पक्षाने जोरदार मुसंडी मारत नऊ जागा जिंकून पंचायत समितीवर वर्चस्व निर्माण केले होते. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सहा जागा मिळाल्या होत्या. तर शिवसेना शिंदे गट या पक्षाला केवळ एक जागा प्राप्त झाली होती. या निकालामुळे खेड पंचायत समितीची सत्ता उद्धव ठाकरे गटाच्या हाती आली. खेड पंचायत समितीच्या पदाधिकारी निवडीवेळी उद्धव ठाकरे गटाने आपल्या सदस्यांना संधी देत सभापती पदासाठी शेलपिंपळगावच्या माजी सरपंच विद्या सयाजी मोहिते पाटील यांची निवड केली होती. तर, काळुस गणातून निवडून आलेले मंगेश गुलाबराव सावंत यांना उपसभापती पदाची संधी मिळाली होती. दोघांनीही मिळून संगनमताने खेड पंचायत समितीचा कारभार अत्यंत पारदर्शकपणे पाहिला. दरम्यान, सभापती आणि उपसभापती या दोन्ही पदांवर एका सदस्याला सहा महिन्यांचा कालावधी देण्याचे ठरले होते. हा ठरलेला कालावधी पूर्ण झाल्याने विद्या मोहिते व मंगेश सावंत यांनी नियमानुसार आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. रिक्त झालेल्या सभापती व उपसभापती पदांसाठी सभागृहात सोमवारी (दि.५ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता ही निवड होणार आहे. या पदांवर कोणाला संधी मिळते, याकडे संपूर्ण खेड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## चाकण येथे खेळाडूंना कीट वाटप



■ **चाकण (दै. संध्या)**

मैदानी स्पर्धांच्या माध्यमातून ग्रामीण भागात दर्जेदार आणि राष्ट्रीय खेळाडू तयार व्हावेत हा हेतू डोळ्यासमोर ठेवून येथील महाराणा प्रताप कबड्डी संघातील सर्व खेळाडूंना किट वाटप करण्यात आले. येथील उद्योजक मनोहर बापू शेवकरी व नगरसेवक मंगेश कांडगे यांनी सांगितले की," महाराणा प्रताप कबड्डी संघाच्या खेळाडूंनी आत्तापर्यंत राष्ट्रीय पातळीवरील अनेक स्पर्धा गाजवल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय खेळाडू निलेश गोरे, निमगावचे माजी सरपंच अमर शिंदे, शिवसेनेचे चाकण शहर प्रमुख महेश शेवकरी व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी विविध स्पर्धांच्या माध्यमातून खेड तालुक्याचे नाव सर्वत्र गाजविले. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक व महाराणा प्रताप कबड्डी संघाचे सहसचिव मंगेश शिवाजी कांडगे यांनी किट वाटप करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे."

यावेळी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांचे बंधू निलेश गोरे, राष्ट्रीय खेळाडू महेश शेवकरी, खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अॅड. विजयसिंह शिंदे यांचे बंधू राष्ट्रीय खेळाडू अमर शिंदे, प्रवीण गोरे व उद्योजक मनोहर शेवकरी उपस्थित होते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की,"खेळाडूंनी मैदानी स्पर्धा गाजविल्या पाहिजेत. वेळ, श्रम व साधनांचा काटेकोरपणे उपयोग करून नियमित व्यायाम करण्याची गरज आहे. चाकण गावाचे नाव सर्वत्र झळकेल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत." अमर शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

## नारायणगावात ज्ञानदानातून राष्ट्रनिर्मिती करणाऱ्या शिक्षकांचा विशेष गौरव

■ **नारायणगाव(दै. संध्या)**



विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या तसेच ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी विशेष योगदान देणाऱ्या शिक्षकांचा शरयू टोयोटा T-Sparsh,पुणे-नाशिक हायवे बायपास,नारायणगाव ता.जुन्नर यांच्या वतीने 'नेशन बिल्डर अवॉर्ड्स २०२६' अंतर्गत विशेष सन्मान करण्यात आला.

शिष्यवृत्ती परीक्षांसाठी मार्गदर्शन,नवोदय विद्यालय व सैनिक स्कूल प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची तयारी, गुणवत्तापूर्ण अध्यापन, शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा, वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन तसेच इस्रो-नासा यांसारख्या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे,असे शिक्षण क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा पुरस्कार शिवनेरभूषण तथा माजी सैनिक रमेश खरमाळे,व्ही.पी.श्री.हेमंत एम्प्लावार,आनंद आंधळे,ऋतुराज पटवर्धन व बाळासाहेब गिलबिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी शरयू टोयोटाचे व्हिपी हेमंत एम्प्लावार यांनी टोयोटाचे सामाजिक योगदान विशद करून उपस्थित शिक्षकांना भरभरून शुभेच्छा दिल्या व ट्रेनर ऋषिराज यांनी राष्ट्रनिर्मितीमध्ये शिक्षकाची भूमिका विशद केली तर सन्मानार्थी शिक्षक बाळासाहेब कानडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी प्रमुख पाहुणे रमेश खरमाळे यांनी शिक्षणासोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी अधोरेखित केली. या भावनेतून वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी केले.१८ शिक्षकांचा गौरव या पुरस्काराने निर्मला मंगेश मेहेर, श्रीकृष्ण विठ्ठल डुकरे, नितीन भास्कर शेजवळ, दत्तात्रय रामहरी आहिरे, अशोक रामजी मावळे, तान्हाजी दत्ताराम जाधव, भारती साईनाथ कनिंगध्वज, राजश्री मनोहर वायकर, गणेश सबाजी बिडवई, राकेश मनोरे, वैशाली श्रीकांत फुलसुंदर, अशोक नामदेव किर्वे, समीर पंढरीनाथ जाधव, विजय ज्ञानेश्वर वामन, राजेंद्र अरुण फापाळे, बाळासाहेब ज्ञानेश्वर कानडे, योगेश भानुदास यादव व बबन शंकर सानप या १८ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे,त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांना शैक्षणिक तसेच विविध स्पर्धात्मक क्षेत्रात पुढे जाण्यासाठी योग्य दिशा मिळावी यासाठी शिक्षक करत असलेल्या प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे




## जिरायती भागातील वीज समस्यांवर रोहिणीताई कदम-ढोले यांचा पाठपुरावा

**मोरगाव : दैनिक संध्या**

बारामती तालुक्यातील जिरायती भागातील विविध गावांमध्ये नागरिकांना भेडसावणाऱ्या वीज समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी पुणे जिल्हा परिषद सदस्या रोहिणीताई संदीप कदम (ढोले) यांनी केली आहे.याबाबत त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) बारामती विभागाच्या मुख्य अभियंत्यांना पत्र दिले आहे.क्षपत्रात नागरिकांना वीजपुरवठ्याच्या विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून,प्रलंबित कामांमुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.संबंधित कामांसाठी आवश्यक साहित्य व मनुष्यबळ उपलब्ध करून कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यामध्ये मोरगाव कदमवस्ती (ढोले मळा) येथे ट्रान्सफॉर्मर व सिंगल फेज लाईन कार्यान्वित करणे,मुर्टी गावातील वाड्यावरस्त्यावरील गावठाण फिडरचे प्रलंबित काम पूर्ण करणे, तसेच मुर्टी येथील संग्राम नलावडे यांच्या ठिकाणी अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर मंजूर करणे,अशा मागण्यांचा समावेश आहे.तरडोली हद्दीतील पुणेकर वस्ती येथे नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करणे, मासाळवाडी हद्दीतील पांडेकर वस्ती येथे ट्रान्सफॉर्मर बसविणे, तसेच मासाळवाडी हद्दीतील देढे कोळेकर वस्ती व भगवान मारुती धायगुडे यांच्या वस्तीकरिता सिंगल फेज वीजपुरवठ्याची सुविधा उपलब्ध करून देणे,पळशीतील पिंगळेवस्ती येथे (लोडशेडिंग, भारनियमन) सिंगल फेज पोलची कामे करणे याबाबतही पत्रातून मागणी करण्यात आली आहे.

## तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलचा दमदार ठसा!

**बारामती : दैनिक संध्या**

तालुकास्तरीय शासकीय क्रीडा स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुल, सावळ येथील १४ वर्षांखालील मुलांच्या कबड्डी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत उपविजेतेपद पटकाविले.या उल्लेखनीय कामगिरीमुळे ज्ञानसागर गुरुकुलच्या क्रीडा क्षेत्रातील यशाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. दोन दिवस चाललेल्या या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत ज्ञानसागर गुरुकुलच्या संघाने सुरुवातीपासूनच आक्रमक आणि शिस्तबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघांवर मात केली.पहिल्या दिवशी दिवसभर झालेल्या विविध सामन्यांमध्ये दमदार कामगिरी करत संघाने उपांत्य फेरीत (सेमी फायनल) प्रवेश निश्चित केला. दुसऱ्या दिवशी झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यातही संघाने शानदार खेळ करत विजय मिळविला आणि अंतिम सामन्यात धडक मारली.अंतिम सामन्यात खेळाडूंनी विजयासाठी शेवटपर्यंत जोरदार झुंज दिली. मात्र,अवघ्या ७ गुणांच्या फरकाने ज्ञानसागर गुरुकुलच्या संघाला विजेतेपदापासून दूर राहावे लागले आणि संघाने तालुकास्तरीय स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानले.

## सानुग्रह अनुदानासाठी नियमित कर्जदार शेतकऱ्यांची प्रतीक्षा

**कवठे येमाई: दैनिक संध्या**

कर्जाची परतफेड वेळेवर करून बँकिंग व्यवस्थेवरील आपली विश्वासार्हता जपणाऱ्या नियमित कर्जदार शेतकऱ्यांची मात्र शासनाच्या सानुग्रह अनुदानासाठी प्रतीक्षा कायम आहे. दुसरीकडे थकीत कर्जदारांना कर्जमाफीचा लाभ मिळत असताना, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान कधी जमा होणार? असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे. त्यामुळे थकीत कर्जदार तुपाशी, नियमित कर्ज फेडणारा शेतकरी उपाशीच म्हणण्याची वेळ आता शेतकऱ्यांवर आली आहे. राज्य शासनाच्या २०२६ च्या कर्जमुक्ती योजनेत नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र सप्टेंबर महिना संपत आला तरी अनेक पात्र नियमित कर्जदार शेतकरी अद्यापही या अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. 'वेळेवर कर्ज फेडले, आता आमचा काय गुन्हा?' असा सवाल शेतकरी करत आहेत. शासनाने नियमित कर्जदारांचा सन्मान करण्याचे आश्वासन दिले; मात्र प्रत्यक्ष लाभासाठी होत असलेली दिरंगाई शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे.

## अबॅकसच्या आंतरराष्ट्रीय परीक्षेत कांडगे प्रथम

**चाकण : दैनिक संध्या**




आंतरराष्ट्रीय अबॅकस गणित महामंडळ, तैवान व भारत, सारा अबॅकस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या अबॅकसच्या ७९ व्या आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेमध्ये आरोही किरण कांडगे ही एम दहा कॅटेगरीमधून २५० पैकी २५० गुण मिळवून सर्वप्रथम आली आहे. भारत देशातून एक हजार पेक्षा जास्त विद्यार्थी आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेमध्ये सहभागी झाले होते. सारा अबॅकस अकॅडमी, चाकण अबॅकसच्या ७९ व्या आंतरराष्ट्रीय मूल्यांकन परीक्षेसाठी ४२ परीक्षार्थी सहभागी झाले होते. त्यातून आरोही किरण कांडगे या विद्यार्थिनीने शंभर टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने येऊन चाकण शहराचे नाव सर्वत्र झळकविले आहे. आरोही हिने गणिताची ५० उदाहरणं अवघ्या ३ मिनिटांमध्ये सोडून २५० पैकी २५० गुण मिळवून प्रथम क्रमांकाने येण्याचा मान मिळविला. संस्थेच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या एका अठराव्या कौतुक सोहळ्यात डी. डी. मोहिते इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्या पौर्णिमा मोहिते, आरोग्य सेवक दयानंद माने, डॉ. अर्चना आघाव व आंतरराष्ट्रीय गणित महामंडळाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण आघाव आदींच्या हस्ते आरोही हिला आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. आरोही ही चाकण येथील उद्योजक किरण कांडगे व रसिका कांडगे यांची रत्नकन्या आहे. आईवडिलांची साथ, चिकाटी, मेहनत, मार्गदर्शन यामुळे आरोही हिने हे उत्तुंग यश मिळवले. आरोही हिच्यावर चाकण पंचक्रोशीतून सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात 'नदी वाचवा'चा जागर!

**शिवस्वरूप ढोल पथकाचा अनोखा जनजागृती उपक्रम; 'पाणी वाचवा, भविष्य वाचवा'चा भिवंडीकरांना संदेश**

■ भिवंडी: (दै. संध्या)

गणेश विसर्जन मिरवणुकीचा उत्साह, ढोल-ताशांचा निनाद आणि भक्तिमय वातावरण याचबरोबर पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देत भिवंडीतील शिवस्वरूप ढोल पथकाने यंदा जनजागृतीचे अनोखे पाऊल उचलले. वक्रतुंड मंडळाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत पाणी संवर्धन आणि नदी प्रदूषण रोखण्याचा संदेश देणारे आकर्षक बॅनर झळकावत पथकाने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.




'माझं पाणी, माझा जीव... मला वाचवा!' तसेच 'आज जर आपण नद्यांना प्रदूषणमुक्त केले नाही, तर येणाऱ्या पिढीला पाण्याचा थेंबही मिळणार नाही', असा आशय असलेल्या संदेशातून पाण्याचे महत्त्व आणि नदी संवर्धनाची गरज नागरिकांसमोर प्रभावीपणे मांडण्यात आली. 'चला, आजच हा संकल्प करूया—नदी वाचली तरच भविष्य वाचेल. शुद्ध पाणी हीच खरी सृष्टीची पूजा आहे. उठा भिवंडीकरांनो, जागे व्हा!' असा थेट आवाहनपर संदेशही बॅनरमधून देण्यात आला. भिवंडी परिसरातील कामवारी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न या उपक्रमाच्या केंद्रस्थानी होता. औद्योगिक क्षेत्रातून येणारे दूषित पाणी, सांडपाण्याचा प्रश्न, नदीपात्रातील जलपर्णी व साचलेली घाण यामुळे नदीच्या नैसर्गिक स्वरूपावर परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांकडून व्यक्त केली जाते. अशा पार्श्वभूमीवर नदी केवळ पाण्याचा प्रवाह नसून मानवी जीवन, पर्यावरण आणि भविष्यातील पिढ्यांच्या अस्तित्वाशी जोडलेला जीवनस्रोत आहे, हा संदेश शिवस्वरूप ढोल पथकाने मिरवणुकीच्या माध्यमातून दिला. गणेशोत्सवातील ढोल-ताशा पथके ही तरुणाईच्या उत्साहाचे आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक मानली जातात. मात्र, या पारंपरिक कलेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांवर जनजागृती करता येते, हे शिवस्वरूप ढोल पथकाने आपल्या उपक्रमातून दाखवून दिले आहे.

गणेश विसर्जन मिरवणुकीत हजारो नागरिक सहभागी होत असताना त्यांच्यापर्यंत पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचवण्याचा हा प्रयत्न विशेष ठरला. भक्तीबरोबरच निसर्गाविषयीची जबाबदारी आणि पुढील पिढीविषयीची बांधिलकी जपण्याचे आवाहन या उपक्रमातून करण्यात आले. नदीचे प्रदूषण रोखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिक, उद्योग, सामाजिक संस्था आणि स्थानिक समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नदी वाचविणे म्हणजे पाणी वाचविणे आणि पाणी वाचविणे म्हणजे भविष्यातील जीवन वाचविणे, ही भूमिका जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम शिवस्वरूप ढोल पथकाने केले. गणेशोत्सवासारख्या मोठ्या सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक आणि पर्यावरणीय संदेश देण्याचा हा उपक्रम नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरला. ढोल-ताशांचा आवाज केवळ उत्सवाचा न राहता 'नदी वाचवा, पाणी वाचवा, भविष्य वाचवा' या जनजागृतीचा आवाज बनला, अशी भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली. शिवस्वरूप ढोल पथकाने उचललेल्या या अभिनव आणि सामाजिक बांधिलकीच्या पावलाचे भिवंडीतील नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे. आगामी काळात नदी संवर्धनाचा हा संदेश अधिक व्यापक स्वरूपात पोहोचून प्रत्यक्ष नदी स्वच्छता व प्रदूषण नियंत्रणाच्या चळवळीला बळ मिळावे.

## ज्ञानेश कुमार अभिमन्यूच्या भूमिकेत?

निवडणूक आयोग ही भारतीय लोकशाहीची अत्यंत महत्त्वाची घटनात्मक संस्था आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्णयांभोवती प्रश्न निर्माण झाले की, त्याकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून न पाहता लोकशाहीवरील जनविश्वासाचा प्रश्न म्हणून पाहणे आवश्यक आहे.

सध्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या (SIR) प्रक्रियेवरून विविध प्रश्न उपस्थित झाले आहेत. दिल्लीतील SIR संदर्भात 'logical discrepancy' नोटिसांच्या निकषांबाबत सर्वोच्च न्यायालयाने आयोगाकडून स्पष्टीकरण मागितले असून, मतदारांना उत्तर देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याबाबतही न्यायालयाने सूचना केल्याचे वृत्त आहे.

याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगातील निर्णयप्रक्रियेबाबतही चर्चा सुरू झाली आहे. काही माध्यमांच्या वृत्तांनुसार दोन निवडणूक आयुक्तांनी काही निर्णयांवर आक्षेप नोंदवले होते; मात्र आयोगाने स्पष्ट केले आहे की अंतिम निर्णय सर्व तीन आयुक्तांच्या एकमताने झाले आहेत. त्यामुळे या परस्परविरोधी दाव्यांबाबत अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी अधिकृत कागदपत्रे आणि न्यायालयीन प्रक्रियेची प्रतीक्षा करणे आवश्यक आहे.




कायदा काय सांगतो?

मतदार यादी अचूक असणे ही निवडणुकीच्या विश्वासार्हतेची मूलभूत गरज आहे. सर्वोच्च न्यायालयानेही मतदार यादी ही सतत अद्ययावत ठेवण्याची प्रक्रिया असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र नाव वगळताना पात्र मतदाराचा हक्क बाधित होणार नाही, यासाठी कारण, पूर्वसूचना, उत्तराची संधी आणि अपीलची प्रभावी व्यवस्था असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

म्हणूनच पुढील उपाय अधिक ठोसपणे राबविण्याची गरज आहे—

१. प्रत्येक वगळलेल्या नावामागचे कारण स्पष्ट असावे.
२. संबंधित मतदाराला पुरेशी आणि सुलभ हरकत-संधी मिळावी.
३. निर्णय कारणांसहित लेखी स्वरूपात उपलब्ध व्हावेत.
४. अपीलची प्रक्रिया सोपी, वेळबद्ध आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात असावी.
५. तांत्रिक किंवा डेटाबेसमधील त्रुटींमुळे पात्र मतदाराचा मतदानाचा अधिकार हिरावला जाऊ नये.
६. आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत आवश्यक ते दस्तऐवजीकरण सार्वजनिक करून पारदर्शकता वाढवावी.

पश्चिम बंगालमधील अलीकडील SIR प्रक्रियेत मोठ्या संख्येने मतदारांनी अपील केल्याचे निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले आहे. ही बाब एक गोष्ट अधोरेखित करते—नाव वगळणे जितके महत्त्वाचे, तितकेच पात्र नागरिकाला ते नाव पुन्हा समाविष्ट करून घेण्यासाठी प्रभावी मार्ग उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे.

चक्रव्यूहातून मार्ग कसा?

महाभारतातील अभिमन्यूला चक्रव्यूहात प्रवेश करता आला; परंतु बाहेर पडण्याचा मार्ग त्याला पूर्णपणे माहीत नव्हता. आजची परिस्थिती त्या प्रतिमेची आठवण करून देणारी असली, तरी येथे 'चक्रव्यूह' मोडण्याचा मार्ग स्पष्ट आहे—कायदा, पारदर्शकता, न्यायालयीन देखरेख, नागरिकांना सुनावणीची संधी आणि तथ्याधारित संवाद. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यापुढील खरी कसोटी व्यक्ती म्हणून नव्हे, तर घटनात्मक संस्थेवरील जनविश्वास अधिक मजबूत करण्याची आहे. आयोगाने प्रश्नांना पारदर्शक उत्तरे दिली, चुका आढळल्यास त्या दुरुस्त केल्या आणि पात्र मतदाराचा हक्क अबाधित ठेवला, तर कोणत्याही संशयाला कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने उत्तर देता येईल. शेवटी निवडणूक जिंकणारा किंवा हरणारा कोणताही पक्ष असो; मतदारांचा विश्वास जिंकला गेला पाहिजे. कारण निवडणूक आयोगाची खरी ताकद केवळ त्याच्या अधिकारात नसून, त्या अधिकाराच्या निष्पक्ष, पारदर्शक आणि कायदेशीर वापराबद्दल जनतेला वाटणाऱ्या विश्वासात आहे.

– सुनील सुंदराबाई धाऊ झळके,
भिवंडी (ठाणे).
*zalke_sunil@yahoo.com

## एमबीए म्हणजे उज्वल भविष्य घडविण्याचा राजमार्ग : गजेंद्रन

■ पिंपरी(दै. संध्या)

एमबीए म्हणजे उज्वल भविष्य घडविण्याचा राजमार्ग आहे. हे शिक्षण घेत असताना आत्मविश्वासाने नाविन्यपूर्ण संकल्पना विकसित कराव्यात. आजचा विद्यार्थी उद्याच्या मोठ्या आस्थापनांचा व्यवस्थापक आहे. ही जबाबदारी घेताना आत्मविश्वास आवश्यक आहे. तो विकसित करण्याचे काम एसबीपीआयएम इन्स्टिट्यूट करते असे डबलूएनएस ग्लोबल सर्व्हिसेस चे कॉर्पोरेट वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्रन गजेंद्रन यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या "आरंभ २०२६ इंडक्शन प्रोग्राम" चे उद्‌घाटन रवींद्रन गजेंद्रन यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमडॉक्स कंपनीचे सॉफ्टवेअर अभियांत्रिकी संचालक रवींदर पाल सिंग, येस बँक समूहचे कार्यकारी उपाध्यक्ष समीर मुळे, एम. वूडपीकर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक समीर कुलकर्णी, एसबीपीआयएम संचालक डॉ. कीर्ती धारवाडकर, प्रथम वर्ष विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले की, एमबीए हे पुढील जीवनाला योग्य आकार देणारा महत्त्वाचा टप्पा आहे. विद्यार्थ्यांनी माऊथ, माईंड, मूड, मनी, मॅनर्स हा यशाचा मूलमंत्र लक्षात ठेवून आचरण करावे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आरंभचे आयोजन करण्यात आले होते. रवींदर पाल सिंग यांनी सांगितले की, एआय आज तुमच्या जीवनाचा भाग बनले आहे. तुम्हाला एक चांगला सादरकर्ता बनावे लागेल. तुमची संशोधन किंवा सर्जनशीलतेची क्षमता गमावू नका नाही तर एआय तुम्हाला गिळून टाकेल.

## केंब्रिज शाळेत गणरायाला भक्ती भावाने निरोप




■ पिंपरी(दै. संध्या)

पुनावळे येथील केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलमध्ये गणेशोत्सवानिमित्त शाळेत सादर केलेल्या "कौशल विकास भारत"च्या देखव्यातून समृद्ध भारताचे विद्यार्थ्यांनी दर्शन घडवले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी गणरायाला ढोल ताश्याच्या गजरात भक्ती भावाने निरोप दिला.

यावेळी महा आरतीला नगरसेविका रेश्मा भुजबळ, शिक्षण मंडळाचे माजी सभापती चेतन भुजबळ, शाळेचे संचालक राम रैना, सचिन गायकवाड, अभिषेक वर्णेकर, प्राचार्या मनीषा साठे आदी पालक विद्यार्थी उपस्थित होते. ग्रामीण जीवनशैलीवर आधारित केलेल्या या सजावटीने "जो हमारे पास है, वो हमारे लिए खास है" हा संदेश अतिशय सुंदरपणे मांडला. दक्षिण भारत,उत्तर भारत, प. भारत आणि तेथील संस्कृतीचे फोटो मांडले होते. "जो हमारे पास है वो खास है " या थीमवर राम रैना यांनी स्वरबद्ध केलेले गाणे स्नेहल कडगांची यांनी सादर केले. कार्यक्रम आयोजनासाठी शाळेचे अध्यक्ष प्रा. धनंजय वर्णेकर, राम रैना यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार रत्ना माने यांनी मानले.

## तिरपणकर यांची राष्ट्रीय भ्रष्टाचार नियंत्रण एवंम जन कल्याण संघटन ठाणे जिल्हा मिडीया समन्व्यक पदी नियुक्ती

■ ठाणे(दै. संध्या)

बदलापूर येथील जेष्ठ पत्रकार, संपादक आणि जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. गुरुनाथ तिरपणकर यांची नियुक्ती भारत सरकार नीती आयोग अंकित राष्ट्रीय भ्रष्टाचार नियंत्रण आणि जन कल्याण संघटन या आस्थापनेच्या ठाणे जिल्हा मिडिया समन्व्यक पदी नियुक्ती करण्यात आली. श्री. गुरुनाथ तिरपणकर हे मुक्त पत्रकारिता तसेच अनेक वृत्तपत्र समूहांमध्ये पत्रकार आणि उपसंपादक म्हणून कार्य करत आहेत. त्यांनी स्थापना केलेल्या जनजागृती सेवा संस्था(रजि)या सामाजिक संस्थेमार्फत असंख्य लोकोपयोगी कार्यें नेहमी सुरु असतात. मुंबई आणि कोकणातील अनेक नागरिकांसाठी त्यांचे उपक्रम नेहमीच उपयुक्त ठरत आलेले आहेत.

त्यांच्या या सामाजिक कार्याची आवड, तळमळ, सर्वांना सोबत घेवून काम करण्याचे संघटन कौशल्य आणि त्याहूनही जास्त मूल्य असलेला प्रामाणिकपणा या सगळ्या गुणांचा हा सन्मान असल्याची भावना त्यांच्या सर्व समूहामध्ये आहे. श्री. गुरुनाथ तिरपणकर एक चांगले सहयोगी, मितभाषी अजातशत्रू असेलेल व्यक्तिमत्व आहे. आपल्या संघटन कौश्यल्याच्या आधारे त्यांनी सर्वसामान्य नारिकापासून उच्चपदस्थ अधिकारी वर्गापर्यंत आपले चंगले स्नेहसंबंध सांभाळले आहेत. विविध सामाजिक संस्थांच्या कार्यकारिणीमध्ये प्रमुख पदाधिकारी म्हणून ते कार्यभार सांभाळत असताना त्यांच्यावर आता आणखी एका मोठ्या ऑर्गनायझेशनची जबाबदारी आली आहे आणि ती जबाबदारी ते समर्थपणे निभावतील.



## थोडक्यात पण महत्वाचे



### भामा इंग्लिश मीडियम मध्ये विज्ञान प्रदर्शन कार्यशाळा संपन्न

**चाकण : दैनिक संध्या**

स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या स्व. आ. सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज आणि भामा इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये विज्ञान प्रदर्शन कार्यशाळा मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाली. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी प्रदूषण नियंत्रण, पर्यावरण संवर्धन, डिजिटल कचरा विघटन, वॉटर हार्वेस्टिंग, पॉलीहाऊस शेती, पवनचक्कीवर आधारित विद्युत प्रकल्प, पावसाचे ऋतुचक्र आदी विषयांवर नावीन्यपूर्ण व कृतीशील विज्ञान प्रयोग सादर केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, संचालक निलेश संभूस, उद्योजक राकेश पटेल, प्राचार्या प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक ज्योती अनाप, विभाग प्रमुख सुवर्णा चौधरी, दत्तात्रय लिंभोरे, वंदना बकाल, सिद्धार्थ मळेवाडी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध प्रयोगांची मान्यवरांनी पाहणी करून त्यांच्या कृतिशीलतेचे व वैज्ञानिक दृष्टिकोनाचे मार्गदर्शक शिक्षकांसह सर्वांचे कौतुक केले. माधुरी गोरे यांनी स्वागत केले. प्रमिला गोरे यांनी आभार मानले.

### पतीसाठी पत्नीने दिली स्वतःची किडनी

**नारायणगाव: दैनिक संध्या**

दोन्ही किडन्या निकामी झाल्याने सहा महिन्यांहून अधिक काळ डायलिसिसवर असलेल्या वडगाव आनंद येथील किशोर गहिनाजी वाळुंज यांच्यावर पुणे येथील इनलॅक्स बुधराणी हॉस्पिटलमध्ये किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. त्यांच्या पत्नी अर्चना वाळुंज यांनी स्वतःची किडनी पतीला दान करून त्यांना नवजीवनाची संधी दिली. प्रत्यारोपणानंतर पती-पत्नी दोघांचीही प्रकृती स्थिर असून ते सुखरूप आहेत. किशोर वाळुंज यांना किडनीच्या आजाराचे निदान झाल्यानंतर मंचर येथील सार्थक हॉस्पिटलमधील नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. प्रितम गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू करण्यात आले. सुरुवातीला कॅथेटरद्वारे डायलिसिस करण्यात आले. त्यानंतर नियमित डायलिसिस सुरू ठेवावे लागले. पुढील उपचारांसाठी नवी मुंबई येथील विनम्र स्वराज हॉस्पिटलमधील डॉ. चौधरी यांचा सल्लाही घेण्यात आला. उपचारादरम्यान फिस्टुला निकामी झाल्याने उपचार प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या. तपासण्यांमध्ये दोन्ही किडन्या निकामी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपणाचा सल्ला दिला. दात्याचा शोध सुरू असतानाच अर्चना वाळुंज यांनी कोणताही संकोच न करता स्वतःची किडनी पतीला देण्याची तयारी दर्शविली. आवश्यक वैद्यकीय तपासण्या, रक्तगट जुळवणी आणि इतर वैद्यकीय व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. या उपचारांसाठी मोठ्या आर्थिक खर्चाची आवश्यकता होती. या कठीण काळात वसंतराव नाईक नागरी सहकारी पतसंस्था, वडगाव आनंदचे चेअरमन नेताजी डोके, व्हाईस चेअरमन राजू चौगुले, संचालक मंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनकर देवकर यांच्यासह उद्योजक, मित्रपरिवार, नातेवाईक, विविध संस्था तसेच अर्चना वाळुंज यांच्या २००१ सालच्या दहावीच्या बॅचने आर्थिक मदतीचा हात पुढे केला. उपचार प्रक्रियेत अवयव प्रत्यारोपण समन्वयक ज्योती शिळमकर, डॉ. भूपेश कवारे, राजूशेठ पायमोडे, डॉ. अनुराग अवस्थी, राजेंद्र वाळुंज तसेच उद्योजक पुनीत बालन, डॉ.योगेश कुटे, शांता कदम, गोरक्ष देवकर,गोविंद वाढवणे,विशाल देवकर, विनोदशेठ गांधी यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले. पतीच्या जीवनासाठी स्वतःची किडनी दान करण्याचा अर्चना वाळुंज यांचा निर्णय पती-पत्नीमधील प्रेम, विश्वास आणि निःस्वार्थ त्यागाचे उदाहरण ठरला आहे. स्वतःचा अवयव दान करून पतीला नवजीवनाची संधी देणाऱ्या अर्चना यांच्या या निर्णयाचे परिसरातून कौतुक होत आहे.



### तुळजाभवानी माता पलंग उत्सव उत्साहात

**नारायणगाव: दैनिक संध्या**

जुन्नर येथील शेकडो वर्षांची ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा असलेला श्री तुळजाभवानी माता पलंग उत्सव यंदाही अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा होत आहे. या निमित्ताने देवीच्या पलंगाचे दर्शन घेण्यासाठी जुन्नर आणि परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. उत्सवाच्या सुरुवातीला परंपरेनुसार पासोडा पूजन करण्यात आले. त्यानंतर धार्मिक विधी आणि परंपरेचे पालन करत गादीची स्थापना करण्यात आली. या सोहळ्यादरम्यान होमहवन आणि महाआरतीचे भव्य आयोजन करण्यात आले होते. पलंग उत्सवाचे औचित्य साधून श्री दुर्गा सप्तशती पाठ, संगीत भजन यांसारख्या विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. जुन्नर येथील या पलंग उत्सवाला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. नगर येथील पलंगे कुटुंब पिढ्यानपिढ्या ही ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरा अत्यंत श्रद्धेने जपत आहेत. या धार्मिक सोहळ्याचे नेटके नियोजन करण्यासाठी आयोजन समितीचे अध्यक्ष कैलास गरिबे, संजय कर्पे,गोकुळ भागवत, अविनाश करडीले, दत्तात्रय करडीले, महेश घोडेकर,प्रशांत फल्ले यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. जुन्नर येथे या पवित्र पलंगाचा एकूण दहा दिवसांचा मुक्काम असतो. या दहा दिवसांत स्थानिक आणि दूरवरून येणारे भाविक दर्शनाचा लाभ घेतात. जुन्नरमधील मुक्काम संपल्यानंतर हा पलंग पुढे तुळजापूरकडे पायी प्रवासासाठी रवाना होतो. देवीच्या विविध धार्मिक विधींमध्ये या पलंगाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, शेकडो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा भाविकांकडून आजही तितक्याच अखंडपणे आणि श्रद्धेने जोपासली जात आहे.

# महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण

## ग्रामपंचायत सिंगापूर व श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था शिरूर यांचा संयुक्त विद्यमाने उपक्रम

**पुरंदर(दै. संध्या)**

पुरंदर तालुक्यातील ग्रामपंचायत सिंगापूर व श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था शिरूर यांचा संयुक्त विद्यमाने पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणासाठी गावात राहणाऱ्या महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण तसेच प्रशिक्षणानंतर संबंधित महिलांना वाहनचालकाचा शिकाऊ परवाना देण्यासाठी सुरू केलेल्या प्रशिक्षणास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

महिलांच्या सबलीकरणसाठी सिंगापूर ग्रामपंचायतीच्या व श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था, शिरूर यांच्या वतीने या प्रशिक्षण वर्गाचा अनोखा उपक्रम ३१ ऑगस्टपासून आयोजित केला होते.तसेच हा उपक्रम 24 सप्टेंबर 2026 रोजी संपन्न झाला महिलांमध्ये आत्मविश्वास आणि सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी महिलांना २२ दिवस हे प्रशिक्षण दिले आहे. महिलांसाठी ते मोफत आहे. हा

एक आगळावेगळा व नावीन्यपूर्ण उपक्रम असल्याने गावातील तरुण मुली, नवविवाहिता यांच्यासह अनेक महिलांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला. यामध्ये जवळपास ३५ हून अधिक महिलांची प्रशिक्षणासाठी नोंद झाली असून, सकाळी ९ वाजल्यापासून ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मोटर ड्रायव्हिंगच्या माध्यमातून महिलांना हे प्रशिक्षण दिले जात आहे.

महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित असलेले मान्यवर सरपंच सौ.अर्चना राजाराम लवांडे,उपसरपंच श्री. विक्रांत सुरेश पवार,सदस्य श्री. विशाल शांताराम लवांडे,सदस्य श्री. सौरभ दिलीप लवांडे, सदस्य सौ.संगीता हनुमंत वारे, सदस्य श्रीम. चांगुणाबाई बाळकृष्ण वाघमारे, सदस्य सौ.मीना गणपत उरसळ ग्रामपंचायत अधिकारी नीलिमा सोमनाथ धाऊत्रे संस्थेचे अध्यक्ष पंकज साबळे ग्रामपंचायत कर्मचारी शुभम उरसळ व सर्व महिला प्रशिक्षणार्थी उपस्थित होत्या.




"घर, संसार, मोलमजुरी, शेतीकाम यासाठी सतत राबणाऱ्या महिला, त्यांना यातून बाहेर पडायला मिळत नाही, त्यांच्या हातात कधी गाडीचे स्टिअरिंग येईल, अशी कल्पनाही मनात आली नव्हती. आपत्तीची महिला किमान वाहन चालविता आले पाहिजे, या उद्देशाने ग्रामपंचायतीने हा उपक्रम राबविल्याने आम्ही याचा लाभ घेत आहोत. ही कला अवगत झाल्यावर याचा आम्हाला दैनंदिन जीवनात, आर्थिक रीती करण्या, बाजारपेठेत शेतमाल पोहोचवण्यास फायदा होईल; तर उदरनिर्वाहासाठी काही महिला वाहतूक व्यवसायासाठीही पुढे येतील.

- पंकज साबळे, अध्यक्ष श्री शिवाजी नॉलेज सिटी संस्था

"गावात येऊन एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षण देण्याचा आमचा पहिलाच उपक्रम आहे. महिलांचा चांगला प्रतिसाद आहे, त्या प्रशिक्षणही चांगल्या प्रकारे घेत आहेत. ही कला लवकर अवगत करत आहेत. ग्रामपंचायतीने राबवलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून, निश्चितपणे महिलांना याचा फायदा होईल, त्या स्वावलंबी होण्यासाठी मदत होईल."

- श्री.विशाल शांताराम लवांडे, सिंगापूर ग्रामपंचायत सदस्य



# आगामी हंगामात १३ लाख मे.टन ऊस गाळप करणार : नितीनकुमार शेंडे

**माळेगाव (दै. संध्या)**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याने आगामी हंगामात १३ लाख मे.टन ऊस गाळपाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. यावर्षी गेटकेन उसाला प्रामुख्याने प्राधान्य देण्यात येणार असल्याचे सांगून कारखाना व उपपदार्थ प्रकल्प पहिल्या दिवसापासून पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न आहे.त्या दृष्टीने कारखान्याचे सर्व विभाग प्रयत्नशील असल्याची माहिती कारखान्याचे उपाध्यक्ष नितीन कुमार शेंडे यांनी दिली. कारखान्याच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने हा निर्णय घेतला असल्याचे नितीनकुमार शेंडे यांनी सांगितले.

माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा २०२६-२७ चा ७१ वा हंगाम सुरू करण्याच्या दृष्टीने बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ कारखान्याचे उपाध्यक्ष नितीनकुमार शेंडे व त्यांच्या सुविध्य पत्नी सौ.कविता नितीनकुमार शेंडे या उभयतांच्या हस्ते विधिवत पूजा करून संपन्न झाला.त्यावेळी शेंडे बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे स्वीय सहाय्यक सचिन यादव, ज्येष्ठ संचालक बाळासो तावरे, तानाजी कोकरे,सौ.संगीता कोकरे,राजेंद्र बुरुंगले, योगेश जगताप, स्वप्नील जगताप, गणपत खलाटे,विजय तावरे, प्रताप आटोळे, सतीश फाळके,अविनाश देवकाते, जयपाल देवकाते,विलास देवकाते, शिवराज जाधवराव, नितीन सातव, देविदास गावडे रतनकुमार भोसले,सौ.ज्योती मुलमुले,रामदास आटोळे, विलास जगताप, दत्तात्रेय येळे, चंद्रशेखर जगताप,संदीप बांदल, विश्वासराव देवकाते, मदनराव देवकाते, किशोर फडतरे, अविनाश गोफणे, शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त कार्यकारी संचालक जितेंद्र रणवरे, ऊस वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सोरटे व ऊस तोडणी वाहतूकदार संघटनेचे सदस्य, कारखान्याचे अधिकारी,कर्मचारी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माळेगाव कारखाना हा सहकाराला दिशा देणारा कारखाना आहे.या कारखान्याची वाटचाल उपमुख्यमंत्री तथा कारखान्याच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. माळेगाव कारखाना गेटकेन धारक व सभासद यांच्या ऊस दरात (कांडेबील) दुजाभाव करीत नाही तसेच वेळेवर पेमेंट अचूक वजन यामुळे या कार खान्याला नियमित ऊस पुरवठा करणारे गेटकन धारक मोठ्या प्रमाणात आहेत.ज्यादा गाळप कमी खर्च व जास्तीचा दर या त्रिसूत्रीनुसार या कारखान्याची वाटचाल सुरू आहे सभासदांचा सात लाख मेट्रिक टन ऊस आहे.

13 लाख गाळप करण्याचे उद्दिष्ट आहे त्यासाठी अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या सुचनेनुसार संचालक मंडळाने फलटण,दौंड,इंदापूर आदी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या गावोगावी बैठका घेतल्या व त्यांना ऊस घालण्याचे आवाहन केले असल्याचेही शेंडे यांनी सांगितले.

यावेळी प्रकाश देवकाते यांनी राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या पेक्षा अधिकचा दर दिला आहे.हे सांगुन आर्थिक परिस्थितीची परखड जाणिव करून दिली.सुत्रसंचालन सुरेश देवकाते यांनी तर संचालक शिवराज जाधवराव यांनी आभार मानले.

# गरीब विद्यार्थ्यांच्या हक्काशी तडजोड खपवून घेणार नाही

**बारामती (दै. संध्या)**

बारामती नगरपरिषदेकडून शालेय विद्यार्थ्यांसाठी पुरविण्यात येणाऱ्या गणवेशाबाबत निविदेतील अटी,शासनाचे गुणवत्ता निकष आणि उपलब्ध लॅब रिपोर्ट यामध्ये तफावत आढळून येत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची सखोल व पारदर्शक चौकशी करण्यात यावी,अशी मागणी विरोधी पक्षनेत्या आरती शेंडगे गव्हाळे यांनी केली आहे.

निविदेच्या अटींनुसार गणवेशाचे कापड 100% पॉलिस्टर नसावे, शर्टिंग कापडाचे GSM 120 ते 130 आणि शूटिंग कापडाचे GSM 200 ते 210 असणे अपेक्षित आहे.मात्र उपलब्ध Bhatia Texlabs अहवालानुसार शर्टच्या नमुन्यांमध्ये 100% पॉलिस्टर आढळले असून GSM अनुक्रमे 118 आणि 110 आहे. त्यामुळे निविदेतील अटींचे पालन झाले का,हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

निविदेतील अट क्र. 16 नुसार लॅब टेस्ट रिपोर्ट व कापडाचा नमुना नगरपरिषदेकडे सादर करून त्यास मान्यता मिळाल्यानंतरच शिवणकाम सुरू करणे अपेक्षित आहे. त्यामुळे मंजूर नमुना, लॅब रिपोर्ट, प्रत्यक्ष पुरवठा, गुणवत्ता तपासणी, बिल व वितरणाची संपूर्ण प्रक्रिया तपासणे आवश्यक आहे.

**गरीब विद्यार्थ्यांच्या हक्काचा प्रश्न**

"हा केवळ गणवेशाचा विषय नाही; हा आपल्या गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या हक्काचा प्रश्न आहे. का आमच्या गरीब मुलांवर अन्याय करता? त्यांच्या अंगावर जाणारा गणवेश दर्जेदार असणे हा त्यांचा हक्क आहे," असे आरती शेंडगे गव्हाळे यांनी म्हटले आहे.

**निविदा प्रक्रियेतील पारदर्शकतेवरही प्रश्न**

"कमी दरात टेंडर भरायचे,काम मिळवायचे आणि नंतर गुणवत्तेत तडजोड करायची असेल, तर चांगल्या दर्जाचा माल देणाऱ्या इतर कंत्राटदारांना समान संधी कशी मिळणार? कमी दराची स्पर्धा असावी; मात्र विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची किंमत कमी करून नाही," असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**जनतेचा पैसा जनतेच्या हितासाठीच**

हा पैसा कुणाच्या वैयक्तिक फायद्यासाठी नाही, तर जनतेच्या करातून आलेला पैसा आहे. त्याचा प्रत्येक रुपया योग्य पद्धतीने आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठीच खर्च झाला पाहिजे.जनतेच्या पैशाचा चुकीचा वापर आम्ही खपवून घेणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.



"गरीब विद्यार्थ्यांच्या हक्काच्या गणवेशात तडजोड आणि जनतेच्या पैशाचा चुकीचा वापर आम्ही खपवून घेणार नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला ठरलेल्या गुणवत्तेचा गणवेश आणि जनतेच्या प्रत्येक रुपयाचा योग्य हिशोब मिळालाच पाहिजे."

- आरती शेंडगे गव्हाळे
विरोधी पक्षनेत्या, बारामती नगरपरिषद

# रस्ता रुंदीकरणानंतर अंतर्गत रस्त्यांच्या बंद स्ट्रीटलाईट पुन्हा प्रकाशात

## माळेगाव रोड येथील टाटा शोरुम ते शारदानगर अंतर्गत रस्त्यांच्या परिसरातील रहिवासी नागरिकांना स्ट्रीट लाईट चालू झाल्याने मोठा दिलासा

**बारामती (दै. संध्या)**

बारामती निरा रोडवरील माळेगाव कॉलनी-शारदानगर, हनुमाननगर, सातववस्ती ता.बारामती रस्त्याच्या परिसरातील रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे गेली कित्येक दिवसांपासून बंद पडलेल्या अनेक स्ट्रीटलाईट नगराध्यक्ष सचिनशेठ सातव व स्थानिक नगरसेवकांच्या पाठपुराव्यामुळे आज पुन्हा सुरू करण्यात आल्या आहेत.त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून अंधारात असलेल्या अंतर्गत रस्त्यांवर आता प्रकाश पडल्याने स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले.

रस्ता रुंदीकरणाच्या कामादरम्यान स्ट्रीट लाईटच्या विद्युत केबल्स खराब झाल्याने जवळपास ११ ठिकाणी अंतर्गत रस्त्यांच्या विद्युतपुरवठा खंडित झाला होता.त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारातून मार्गक्रमण करावे लागत होते. स्थानिक रहिवाशांनी ही समस्या मागील आठवड्यात नगरीचे नगराध्यक्ष श्री. सचिनशेठ सातव,नगरसेवक श्री.राजेंद्र (नाना) सोनवणे व नगरसेविका ॲड.सौ. अश्विनीताई सातव यांच्या निदर्शनास आणून दिली होती.त्यानंतर नगराध्यक्ष सचिनशेठ सातव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता श्री.सुभाष पाटील साहेब,तांबे साहेब तसेच नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री.पंकज भुसे साहेब यांना माळेगाव रोड येथील अंतर्गत रस्त्यांच्या स्ट्रीट लाईट तातडीने चालू करणेबाबत नियोजन करावे व त्यांना योग्य सुचना करुन नगरपालिका प्रशासनातील विद्युत अभियंता श्री.राजेंद्र बाड साहेब नगरपरिषद विद्युत विभागातील वरिष्ठ कर्मचारी श्री.बाळासाहेब सुतार,शफीक शेख,समुद्रा विद्युत कंपनीचे अधिकारी-कर्मचारी या सर्वांच्या सहकार्याने तसेच नगराध्यक्ष सचिनशेठ सातव यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्षम नगरसेवक राजेंद्र (नाना) सोनवणे,कार्यक्षम नगरसेविका सौ.अश्विनीताई सातव या नगरसेवकांच्या पाठपुरावा व प्रयत्नातून गेली कित्येक दिवसांपासून बंद असलेल्या स्ट्रीटलाईटची दुरुस्ती करून त्या कार्यान्वित करण्यात आल्या.

माळेगाव रोड वरील रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या ११ ठिकाणी टाटा शोरूमसमोरील परिसर, भीमरत्ननगर,शितोळे नगर,रियल मॉड्युलर जवळील रस्ता,शितोळे व्यापारी संकुलालगतचा रस्ता,स्कोडा शोरूमजवळील परिसर,उत्तम सरोदे व बगाडे यांच्या घराशेजारील रस्ता,स्कोडा शोरूम ते म्हसोबा मंदिर दरम्यानचा रस्ता,श्री.बापुजी सातव व काकाजी सातव यांच्या घराशेजारील रस्ते,जोगेश्वरी मिसळ समोरील आरंभ हॉटेलजवळील रस्ता तसेच पांचागणे कॉर्नर लगत हनुमंत तरटे सर यांच्या घराशेजारील अंतर्गत रस्त्यावरील स्ट्रीटलाईट सुरू करण्यात आल्या आहेत. स्ट्रीटलाईट सुरू झाल्याने परिसरातील रहिवासी नागरिकांना रात्रीच्या वेळी ये-जा करताना मोठा दिलासा मिळाला असून, नगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेतल्याबद्दल बारामती नगरीचे नगराध्यक्षसचिनशेठ सातव नगरसेवक श्री.राजेंद्र ( नाना) सोनवणे, सौ.अश्विनीताई सातव यांचे स्थानिक रहिवासी, नागरिकांनी आभार मानले.

